म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. १०५१
1580

# शिक्षणाची समान संधी

देवदत्त दाभोलकर

REFBK-0015942

समाज प्रबोधन संस्था

# शिक्षणाची समान संधी

देवदत्त दाभोलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. १५९८२
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ७८२४० वि: निबंध
१७४५७ नों: दि: २५।३।९८

REFBK-0015942

समाज प्रबोधन संस्था

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.

**किंमत :**
**एक रुपया वीस पैसे**

© समाज प्रबोधन संस्था
प्रथमावृत्ती सप्टेंबर १९६७

श्री. मा. ह. पटवर्धन, संगम प्रेस, ३८३ नारायण पेठ, पुणे यांनी छापले व श्री. शंकरराव देव, अध्यक्ष, समाज प्रबोधन संस्था, ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे यांनी प्रकाशित केले.

रामानुजमचे * अल्पायुषी जीवन आणि मृत्यू ह्या भारतातील आजच्या परिस्थितीच्या निदर्शक अशा प्रतीकात्मक घटना आहेत. आपल्या अनेक कोटी लोकसंख्येत शिक्षणाचा स्पर्श फारच थोड्या लोकांना होतो. आणि ज्यांना स्पर्श होतो, त्यांच्यापुढेही दरिद्री खर्डेघाशीहून अधिक आशादायक भवितव्य नसते. जीवनाची दारे जर ह्या लोकांना खुली झाली, अन्न, आरोग्य, शिक्षण आणि विकासाची संधी ह्या गोष्टी जर ह्या लोकांना उपलब्ध होऊ शकल्या तर ह्या कोटी कोटी जनतेतून असंख्य शास्त्रवेत्ते, तंत्रज्ञ, शिक्षणशास्त्रज्ञ, उद्योगपती, लेखक आणि कलावंत निर्माण होतील आणि ते एक नवा भारत आणि एक नवे जग घडविण्याच्या कार्याला हातभार लावतील.

**जवाहरलाल नेहरू ('भारताचा शोध')**

---

* रामानुजम ह्या दक्षिण भारतातील प्रसिद्ध गणितज्ञाचा निर्देश करताना जवाहरलालजींनी हे उद्गार काढलेले आहेत. आत्यंतिक द्रारिद्र्यात आणि प्रतिकूल परिस्थितीत रामानुजमला आपले जीवन कंठावे लागले. त्याची गणिती प्रतिभाच इतकी तेजस्वी होती की त्याही परिस्थितीत त्या प्रतिभेचे तेज जगाच्या निदर्शनाला आल्याखेरीज राहिले नाही. दारिद्र्याच्या परिणामामुळेच रामानुजम अल्पायुषी झाला व भारत आणि जग एका प्रतिभावान् गणितज्ञाला मुकले.

# अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रास्ताविक | ... ५ |
| आर्थिक विकासासाठी | ... ७ |
| लोकशाही समाजवादाचा पाया | ... १० |
| समान संधीचा आशय | ... १४ |
| असमान संधी : आर्थिक बाजू | ... १७ |
| असमान संधी : सामाजिक बाजू | ... २२ |
| असमान संधी : प्रादेशिक बाजू | ... २९ |
| संधीच्या समानतेचे तंत्र | ... ३४ |
| शिक्षणाच्या विविध स्तरांवरील विषमता व तिचे निराकरण | ... ३९ |
| निवडक प्रवेशाचे धोरण | ... ४४ |
| महाराष्ट्राची वाटचाल | ... ५० |
| समारोप | ... ५४ |

# प्रास्ताविक

'मागास देशांच्या विकासात शिक्षणाचे स्थान'[१] या अॅडॅम कर्लच्या पुस्तकाला पूरक म्हणून हे विवेचन करण्यात आलेले आहे.

शिक्षण महामंडळाने आपल्या अहवालात शिक्षणाची समान संधी या विषयाचा विचार केला आहे. परंतु तरीही अधिक विचार होण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाची समान संधी आणि आपल्याला अभिप्रेत असलेली समाजवादी समाज-रचना यातील संबंध नीट स्पष्ट झाला पाहिजे. शिक्षणाच्या प्रसारामुळे विकसनशील देशांत वर्गावर्गांतील अंतर हे कमी होत जाण्याऐवजी अधिक दृढ होत जाण्याची किंवा वाढतही जाण्याची शक्यता असते असा ओझरता निर्देश शिक्षण महामंडळाने केलेला आहे. परंतु त्याची प्रक्रिया व हे असे होऊ नये यासाठी आवश्यक असणारी उपाययोजना यांचा तपशीलवार विचार केलेला नाही. शिक्षणाची समान संधी उपलब्ध न होण्यामागे आर्थिक कारणांइतकीच, किंबहुना त्याहूनही अधिक प्रमाणात, सामाजिक कारणे उभी असतात. ज्याच्या घरात अखंड दारिद्र्य नांदत आले आहे परंतु विद्यार्जनाची परंपरा आहे, त्या घरातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्नही बिकटच असतो. परंतु ज्या घरात अनेक शतके साक्षरतेचाहि स्पर्श झालेला नाही त्या घरातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या प्रश्नापेक्षा तो कितीतरी पटींनी अधिक सोपा असतो. या सामाजिक संतुलनासाठी नेमके काय करता येईल या विवेचनाच्या तपशीलातही शिक्षण महामंडळ शिरलेले नाही.

शिक्षण महामंडळाच्या प्रवेशविषयक धोरणाविषयी (एनरोलमेंट पॉलिसी) बरीच टीका झाली आहे. यातील पुष्कळशी टीका शिक्षण महामंडळाची भूमिका नीट समजून न घेतल्याने किंवा त्या सूचनांच्या मागे असलेल्या गृहीतकृत्यांचा विसर पडल्यामुळे करण्यात आलेली आहे. शिक्षण महामंडळाचे प्रवेशविषयक धोरण हे प्रत्यक्षात कनिष्ठ वर्गांना शिक्षणाची समान संधी नाकारणारे होईल अशा शंकेतून या टीकेचा प्रादुर्भाव झालेला आहे ही गोष्ट उघड आहे. विकसनशील अर्थव्यवस्थेत

१. अॅडॅम कर्ल, 'मागास देशांच्या विकासात शिक्षणाचे स्थान', भाषांतर : ग. वि. अकोलकर, समाज प्रबोधन संस्था, पुणे २.

शिक्षणाची संधी उत्तरोत्तर वाढत जाईल. या संधीचा वाटाही काही वर्गांना अधिक व काही वर्गांना कमी मिळण्याची शक्यता आपल्याला जाणीवपूर्वक प्रयत्नांनी टाळता येईल अशी शिक्षण महामंडळाची भूमिका आहे व या स्वरूपात या भूमिकेवर आक्षे घेण्यासारखे खरोखर काही नाही. परंतु सर्व वर्गांना या समप्रमाणाकडे–दर्जाचा आग्रह राखून–कसे नेता येईल याविषयीचे तपशील मात्र बारकाईने ठरविण्याची गरज आहे.

याखेरीजही एकदोन संदर्भांत शिक्षण महामंडळाच्या सूचनांचा शिक्षणाच्या समान संधीच्या दृष्टीने फेरविचार होणे आवश्यक आहे. कर्जाऊ शिष्यवृत्त्यांविषयीचा शिक्षण महामंडळाचा दृष्टिकोन अधिक आग्रही राहू शकला असता तर बरे झाले असते असे वाटते. त्याचप्रमाणे शिक्षणाच्या समान संधीच्या दृष्टीने मातृभाषेतूनच पदवीपरीक्षेपर्यंत सर्व स्तरांवर शिक्षण दिले जाणे कसे निकडीचे आहे हा विचारही त्या दृष्टिकोनातून पुढे मांडला जाणे आवश्यक आहे. नवीन भाषा शिकणे (मग ती संस्कृत असो की इंग्रजी असो) हा सांस्कृतिक दृष्ट्या अनेक शतके मागे राहिलेल्या लोकांच्या दृष्टीने एक मोठाच दुष्कर भाग असतो.

शिक्षणाच्या समान संधीचे शक्य तितक्या साकल्याने विवेचन करण्याचा प्रयत्न आपल्याला करावयाचा आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५९७२
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रमांक ९६२८० वि: निबंध
९०४९ ग्रंथ ३१८८

एक

# आर्थिक विकासासाठी

आर्थिक विकासासाठी शैक्षणिक प्रगतीची आवश्यकता असते याविषयी कोणाचे दुमत नाही. आर्थिक विकासासाठी आवश्यक असणाऱ्या भांडवल गुंतवणीपैकी एक महत्त्वाचा भाग शिक्षणाच्या विकासासाठी केलेली भांडवल गुंतवणूक हा असतो. हा विचारही आता सर्वमान्य होऊ लागलेला आहे. किंबहुना शिक्षणविषयक खर्चाकडे केवळ एक सार्वजनिक सुखसोयीची बाब या दृष्टीने न पाहता राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने एक अत्यावश्यक भांडवल गुंतवणूक या दृष्टिकोनातून आता प्रगत राष्ट्रे पाहत असतात. अर्थात् इतर भांडवल गुंतवणुकीप्रमाणेच येथेही ही गुंतवणूक कोणत्या विभागात, कोणत्या क्रमाने, गतीने करावी ह्या अशा प्रश्नांचा निर्णय करावाच लागतो.

शिक्षणाकडे राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी एक आवश्यक भांडवल म्हणून जाणीवपूर्वक पाहिले जात नसेल तर त्यात अनेक धोके संभवतात. युद्धासारख्या आणीबाणीच्या काळात ज्या वेळी काटकसरीचा प्रश्न निर्माण होतो त्या वेळी कपातीची पहिली कुऱ्हाड शिक्षणखर्चावर पडते. राष्ट्राचा भावी आर्थिक विकास व राष्ट्राचे भावी संरक्षणसामर्थ्य आपण दुबळे करीत आहोत याची जाणीव मग राहत नाही. तसेच ही ' भांडवली ' दृष्टी नसेल तर आपण केवळ खर्च केला की आपले काम झाले अशी अल्पसंतोषी, आत्मसमाधानी वृत्ती निर्माण होते. आपल्या शिक्षणविषयक प्रयत्नांचा राष्ट्राच्या विकासाच्या प्रयत्नाशी वारंवार मेळ घालण्याचे अवधान मग राहत नाही. विकासाचा क्रम व शिक्षणव्यवस्था यांत मेळ राहिला नाही की सुशिक्षित बेकारांचा प्रश्न निर्माण होतो. महाराष्ट्राचे एक मान्यवर नेते या संदर्भात एकदा म्हणाले, ' महाविद्यालयात शिक्षणाच्या तालुकानिहाय प्रसारामुळे सुशिक्षित बेकार निर्माण होतील असे सांगितले जाते. परंतु अशिक्षित बेकारांपेक्षा सुशिक्षित बेकार मी अधिक पसंत करतो. ' असे विधान केवळ आग्रही उत्तर म्हणून केले जाऊ शकेल. किंवा आजची असमाधानाची परिस्थिती बदलणारे क्रांतिकारक हेदेखील अशा वैफल्यग्रस्त सुशिक्षित बेकारांतूनच निर्माण होतील अशा स्फोटक क्रांतिकारक विचारसरणीचे निदर्शक म्हणून केले जाऊ शकेल. समंजस शासनाची भूमिका याहून

अधिक डोळस असली पाहिजे. आपल्याला विकासाच्या कोणत्या दिशेने जावयाचे आहे याची जाणीव, मार्गक्रमणाच्या टप्प्यांची कल्पना, व सामाजिक न्यायप्रस्थापनेची उत्कट इच्छा या गोष्टी यासाठी आवश्यक आहेत. असे नसेल तर शिक्षणावर आम्ही एकूण एवढा खर्च करतो एवढेच पुरोगामित्वाचे बिरुद मिरवावे लागेल. विकासाच्या प्रयत्नाच्या दृष्टीने वा सामाजिक न्यायप्रस्थापनेच्या दृष्टीने फारच थोडे श्रेय हाताशी लागेल.

विकास प्रयत्नाशी सुसंवाद व सामाजिक न्यायप्रस्थापनेचा प्रयत्न ह्या दोन गोष्टी एकाच वेळी साध्य करणे जागरूक प्रयत्नानेच शक्य होते. असा जागरूक प्रयत्न केला नाही तर विकासाच्या वेगवान् प्रयत्नात सामाजिक विषमता कमी होत जाण्याऐवजी वाढत जाण्याचीही शक्यता असते. अन्नधान्य उत्पादन वेगाने वाढवावयाचे ठरले की ज्यांच्याकडे इतर साधने असण्याची व त्यामुळे अधिक उत्पादन काढण्याची शक्यता असते अशा वरिष्ठ जमीनधारकांच्याकडेच मदतीचे प्रवाह वाहू लागतात. ते अधिक श्रीमंत होऊ लागतात. गरीबांतील व त्यांच्यातील अंतर वाढू लागते. समतेच्या उलट दिशेने वाटचाल होऊ लागते. हे जसे इतर क्षेत्रात घडते त्याप्रमाणे शिक्षणाच्या क्षेत्रातही घडते. ज्यांच्या जवळ आधी काही आहे त्यांनाच अधिक मिळत राहते. (१२०० रु. च्या खाली उत्पन्न असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना फी माफी दिली तरी, ज्या कुटुंबातून मुलाने धनार्जन न करता काही वर्षे त्याच्या निवासभोजनाच्या खर्चाची तरतूद करण्याची शक्यता असेल अशाच कुटुंबातील मुलगा शिक्षणासाठी जाऊ शकतो. उलट टोकाला मेडिकल, इंजिनिअरिंग यांसारख्या आजच्या धनप्रद शिक्षणक्रमांच्या बाबतीत वरीलसारखीच परिस्थिती आढळून येते.) या प्रक्रियेतून सहजपणे सुटका होण्यासारखी नाही. परंतु सुटका होण्यासारखीच नाही असे मात्र नव्हे.

या ठिकाणी एक गोष्ट स्पष्टपणे ध्यानात वागवणे मात्र इष्ट होईल. सर्वांना समान संधी देण्याचा प्रयत्न हा विकासाला अनुकूल नसतो असे मानणे चुकीचे होईल. एका विशिष्ट कालखंडात तो तसा भासमान होणे वर सांगितलेल्या कारणामुळे शक्य आहे. परंतु अशा प्रयत्नांमुळे विकासाची गती काही काळ कमी झाल्यासारखी वाटली तरी, खऱ्या अर्थाने सर्वांना समान संधी मिळवण्याच्या ध्येयापर्यंत आपण जाऊन पोहोचू त्या वेळी, या समान संधीच्या अभावी वाढली असती त्याहून कितीतरी अधिक प्रमाणात, ही विकासाची गती वाढलेली असेल. कारण समाजाच्या सर्व

थरांतील व्यक्तींच्या कर्तृत्वाचे पूर्ण विकसित प्रवाह त्या वेळी राष्ट्राच्या विकास-कार्याला येऊन मिळालेले असतील.

समाजाच्या विविध वर्गांतील, जातीजमातीतील विषम संधीतून निर्माण झालेला कडवटपणा यानंतर पुष्कळच कमी झालेला असेल हा, कदाचित् पैशात मोजता येण्यासारखा नसला तरी, फार मोठा लाभ आहे हेहि मान्य व्हावयास हरकत असू नये.

दोन

# लोकशाही समाजवादाचा पाया

भारताला अभिप्रेत असलेली 'समाजवादी समाजरचना' लोकशाही समाजवादाची आहे.

रक्तमय क्रान्तीच्या मार्गाने समता प्रस्थापित करावयाचा साम्यवादाचा मार्ग हा इष्ट मार्ग नव्हे हे भारताने ओळखले आहे. परंतु नजीकच्या भविष्यकाळात–निदान एका पिढीच्या काळात–समृद्धी व समता या दिशेने आपल्याला काही स्पष्ट वाटचाल करावयाची असेल, तर त्याची काही पथ्ये कसोशीने पाळली पाहिजेत याची जाणीव आपल्याला जितकी असावयास हवी तितक्या प्रमाणात आहे असे म्हणता येणार नाही. या सर्वच पथ्यांचा शिक्षणाशी निकटचा संबंध येतो असे नाही. योग्य शिक्षणाने या पथ्यांच्या पालनाविषयी सर्वसामान्य जनतेची अनुकूल मनोभूमिका तयार होण्यास मदत होते असा एक सर्वसाधारण फायदा सांगता येईल. परंतु यातील काही पथ्ये अशी आहेत की, त्यांचा शिक्षणाच्या प्रसाराशी आणि शिक्षणाच्या समानसंधीशी निकटचा संबंध आहे. सुरवातीला लोकशाही समाजवादाच्या दृष्टीने आवश्यक अशी कोणती पथ्ये आहेत ते पाहू. ती अशी :

(१) आर्थिक विकासाच्या काळात अपरिहार्यपणे जी विषमता प्रादुर्भूत होईल किंवा वाढीला लागेल तिच्याविषयी जागरुक राहणे, ती जरूरीपेक्षा अधिक वाढणार नाही अशी दक्षता घेणे, भावी काळात या विषमतेचा निरास करता येईल अशा योग्य त्या तरतुदींच्या दिशेने तयारी ठेवणे, व ही विषमता दैनंदिन जीवनात लोकांच्या डोळ्यात खुपणार नाही (श्रीमंतांच्या भपकेबाज चैनीच्या प्रकारामुळे) याची काळजी घेणे. या सर्व बाबतीत शिक्षणाला करता येण्यासारखे कार्य थोडे आहे. श्रीमंत वर्गाला आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देण्याचे कार्य काही प्रमाणात शिक्षणाकडून अपेक्षिता येईल. परंतु ते प्रमाण अत्यल्पच राहणार.

(२) समाजवादाच्या दिशेने वाटचाल होत असताना सरकारी अर्थक्षेत्र हे फार झपाट्याने वाढत असते. केन्द्रसरकार, राज्यसरकार, जिल्हा परिषद, अशा वेगवेगळ्या स्तरांवर हे अर्थक्षेत्र काम करू शकते. लोकशाही समाजवादाला उपयोगी अशी सहकाराची चळवळदेखील भारतासारख्या देशात पुष्कळशी सरकारी प्रेरणेने,

पैशाने व पाठिंब्याने उभी राहत असते. अशा परिस्थितीत दोन गोष्टी सांभाळाव्या लागतात :(अ) या सरकारी छायेतून अधिकारारूढ पक्षाची भावी निवडणूक यंत्रणाच अप्रत्यक्षपणे उभी होत नाही याची काळजी घेणे; व (ब) याच्या उलट, सर्व काही व्हावयाचे ते सरकारनेच करावयाचे आहे, सरकारने ते केलेच पाहिजे, आपल्या कर्तृत्वाचा काही भाग त्यात असण्याची आवश्यकता नाही अशी उर्मट अपेक्षेची व तटस्थ कर्तृत्वशून्यतेची भूमिका जनता घेत नाही याची दक्षता बाळगणे. आजच्या भारतीय परिस्थितीत हे दोन्ही धोके अस्तित्वात आहेत हे जाणकार मान्य करतील. लोकशाही समाजवादी समाजरचनेत नागरिकांचे काही हक्क असतात; ते मिळाले म्हणून त्याने सरकारचे किंवा राज्यकर्त्या पक्षाचे मिंधे असण्याचे कारण नाही. त्याचप्रमाणे त्याची काही कर्तव्येही असतात आणि ती त्याने उत्साहाने, कर्तव्यभावनेने पार पाडली तरच लोकशाही टिकू शकते व समृद्धी निर्माण होऊ शकते. या गोष्टींची जाणीव जनतेला करून देणे आवश्यक असते. जुन्या पिढीत ही जाणीव शिक्षण-क्षेत्राच्या प्रयत्नाने निर्माण होणे दुर्घट आहे. परंतु नव्या पिढीत हे संस्कार शिक्षण-क्षेत्राच्या प्रयत्नाने रुजविता येतील.

(३) समृद्धीसाठी प्रयत्न करीत असताना देशातील साधनसामग्रीचा, मनुष्यबळाचा, बुद्धिबळाचा अधिकात अधिक वापर करून घेणे आवश्यक असते. यातील कोणताही भाग अज्ञानाने, रूढीच्या बंधनाने, अवहेलनेने दुर्लक्षित ठेवणे विकासाला हानिकारक असते. पुढील दहावीस वर्षांच्या काळात कोणकोणत्या कार्यक्षेत्रांत किती तंत्रज्ञांची, अधिकाऱ्यांची, कारागिरांची, व्यावसायिकांची गरज लागणार आहे याचे अंदाज घेणे हे योजनाकारांचे काम आहे. त्या त्या क्षेत्रातील ह्या अपेक्षा पूर्ण कशा होतील याचा विचार करणे व त्या दिशेने कार्यवाही करणे हे शिक्षण-क्षेत्राचे काम आहे. आज अजूनही अशा नेमक्या आखणीच्या दृष्टीने आपण बरेचसे अंधारातच आहोत हे मान्य केले पाहिजे. यामुळे अशा अंदाजांच्या आधारावर आपले प्रवेशविषयक धोरण आखले पाहिजे या शिक्षणमहामंडळाच्या सूचनेचा पायाच धोक्यात येतो. परंतु आपल्या साधनसामग्रीचा अपव्यय टाळावयाचा असेल, व कमी साधनांच्या साहाय्याने अधिक यश संपादन करावयाचे असेल तर त्याच दिशेने वाटचाल चालू राहिली पाहिजे यात शंका नाही.

(४) अविकसित राष्ट्रांत लोकशाही समाजवादाच्या दिशेने वाटचाल करीत असताना वरील तीनही गोष्टी महत्त्वाच्या असल्या तरी शिक्षणाची समान संधी ही

या संदर्भात सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे असे म्हणावयास हरकत नाही. लोकशाही समाजवादाच्या सुदृढ उभारणीसाठी भारतासारख्या देशात जर आपण दोन पिढ्यांचा (सुमारे अर्धशतकाचा) काळ आवश्यक मानला, तर त्या काळात करावयाच्या पायाभूत प्रयत्नांत आर्थिक विकासाचा प्रयत्न, आर्थिक विषमतेचे अंतर कमी करण्याचा करयोजनेचा प्रयत्न व शिक्षणाच्या समान संधीचा प्रयत्न या तीन गोष्टींना अग्रक्रम द्यावा लागेल. या तिन्हीतही तरतमभावाने क्रम लावावयाचाच असेल तर शिक्षणाच्या समान संधीच्या सुजाण प्रयत्नाला अग्रक्रम द्यावा लागेल. सुजाण या शब्दामागे आडवळणाने शिक्षणाचा प्रयत्न आजच्या तथाकथित बुद्धिमान वर्गापुरता मर्यादित करण्याचा हेतू नाही. परंतु शिक्षणाची दिशा विकासाच्या प्रयत्नाशी सुसंवादी असेल, कोणताही बुद्धिमान विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, मागसवर्गातील बुद्धिमान विद्यार्थी शोधून काढण्याचा विशेष कसोशीने प्रयत्न होईल, ज्या व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक अडचणींमुळे त्यांच्या अंगभूत बुद्धिमत्तेचा आज विकास होत नाही त्या अडचणी दूर करण्याचा कटाक्षाने प्रयत्न केला जाईल, या अशा सर्व गोष्टींचा अंतर्भाव या ' सुजाण ' प्रयत्नात आवश्यक मानलेला आहे. शैक्षणिक दर्जा घटतो या भीतीने संख्येवर मर्यादा ठेवून हा प्रश्न सुटणार नाही. त्याचप्रमाणे आपण अनेक विद्यालये व महाविद्यालये खेड्यातून, ग्रामीण भागातून काढली व सामाजिक क्रान्तीचे कार्य पूर्ण केले अशा कृतकृत्यतेच्या भावनेतूनही हा प्रश्न सुटणार नाही.

या प्रयत्नातून दोन गोष्टी साध्य होतील. एकतर योजनाबद्ध द्रुत विकासाच्या काळात कुशल तंत्रज्ञांची, अधिकाऱ्यांची, कार्यकर्त्यांची नेहमीच उणीव भासत असल्यामुळे शिक्षणक्रम जर विकासाच्या प्रयत्नाशी सुसंवादी असेल तर एकाला संधी देण्यासाठी दुसऱ्याला मागे ओढण्याचे तत्त्व अंगीकारण्याचे कारणच पडणार नाही. विशिष्ट परिस्थितीत निर्माण झालेली ही प्रतिक्रिया आपोआप विरून जाईल. द्रुत आर्थिक विकास झाला नाही, किंवा होऊनही लोकसंख्येच्या भरमसाट वाढीमुळे आपले जीवनमान वर सरकू शकले नाही तर भारताचे सर्वच प्रश्न, केवळ बिकटच नव्हे तर, स्फोटक होतील हे या संदर्भात निरंतर लक्षात ठेवले पाहिजे. त्या परिस्थितीत वर्गावर्गातील, जातीजातीतील संघर्ष तीव्रतरच होत जातील व लोकशाही हे केवळ एक दिवास्वप्न ठरेल. म्हणून आपण करावयाचे विवेचन ही गृहीतकृत्ये धरूनच केले पाहिजे. व्यवहारतः हे अशक्य आहे असे मानणारे लोक एका आगामी सर्वनाशाची

ग्वाही देत आहेत, किंबहुना आपल्या वृत्तीने तो जवळ आणण्यासही मदत करीत आहेत, एवढेच फारतर म्हणता येईल.

सकस शिक्षणाचे प्रवाह आपण प्रत्येक वर्गातील, जातीतील बुद्धिमान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवू शकलो तर समान संधीचे हे तत्त्व आपण साध्य केले असे म्हणता येईल. त्यासाठी करावयाची योजना ही आज कल्पिलेल्या योजनेपेक्षा कितीतरी अधिक सर्वंकष असावी लागेल. हा शिक्षित वर्ग जातिबंधनांनी जखडलेला राहणार नाही, जातिभावनेला खतपाणी घालून आपले हितसंबंध समाजहिताच्या विरोधी जाऊन टिकविण्याचा प्रयत्न करणार नाही, त्याचप्रमाणे अहंकारी भावनेने, परकीपणाने आपल्या समाजापासून अलग पडून फटकून राहणार नाही, याविषयीही दक्षता घ्यावी लागेल. असे झाले तर पाच हजार वर्षांच्या सामाजिक विषमतेचे अंतर आपण पन्नास वर्षांत काटू शकू व त्यानंतरची येणारी पिढी अधिक समपातळीवरून स्पर्धेच्या क्षेत्रात उतरू शकेल.

तीन

# समान संधीचा आशय

समान संधी उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नाची रूपरेखा देण्याआधी काही गोष्टी स्पष्ट करणे आवश्यक आहे. त्यातील काही सहज लक्षात येण्यासारख्या आहेत. परंतु तरीही त्यांचा एकवार निर्देश करणे उचित होईल. त्या अशा:

(१) शिक्षणाची समान संधी याचा अर्थ पात्रतेचा विचार न करता सर्वांना सारख्याच ज्ञानशाखांचे सारख्याच पद्धतीचे शिक्षण देणे असा नव्हे. विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक प्रवृत्तींना अनुरूप असे विविध अभ्यासक्रम असतील. कमीअधिक बुद्धीच्या विद्यार्थ्यांना पेलतील असे कनिष्ठ, मध्यम व वरिष्ठ पातळीचे अभ्यासक्रमही असतील. आजही ते तसे असतात. परंतु बुद्धीची कसोटी आज केवळ परीक्षेतील गुणसंख्येच्या आधाराने मापली जाते. विद्यार्थ्यांच्या आर्थिक व सामाजिक अडचणींचा विचार या तुलनेत होत नाही व झाला तर फारच ढोबळपणे होतो.

(२) सर्वांना शिक्षणाची समान संधी देणे याचा अर्थ आज जे वर आहेत त्यांना खाली ओढून सर्वांना समपातळीत आणणे असा नव्हे. सुदैवाने आज तो तसा करण्याची गरजही नाही. विकसनशील अर्थव्यवस्थेत सुशिक्षित व प्रशिक्षित लोकांची एवढी वाढती गरज असते की आपण जितक्या अधिक लोकांना शिक्षण देऊन तयार करू शकू तितके हवेच आहे. परिस्थिती अशी राहिली नाही व कोणत्याही कारणाने विकासाची गती रोखली गेली तर आपले धोरण काय राहावे असा ह्यावर तात्त्विक प्रश्न विचारता येईल. याला तात्त्विक उत्तर अर्थातच भूदानाच्या संदर्भात विनोबाजींनी दिले त्याच पद्धतीचे कदाचित् द्यावे लागेल. आपल्याकडे वाटण्यासाठी दारिद्र्याखेरीज दुसरे काही नसेल तर दारिद्र्यच समविभागात वाटून घेणे हे आपले कर्तव्य आहे असा या उत्तराचा आशय आहे. या उत्तरामागील भावनेची उत्कटता स्पष्ट आहे. तशा निकराने पाहिल्यासच केवळ, आपले हितसंबंध साचेबंद समाजरचनेत सांभाळत राहणे एवढेच आपले कर्तव्य नसून, परिवर्तनशील व गतिमान समाजव्यवस्थेसाठी आपण क्रियाशील राहणे व आज आपल्याला मिळेल ते अनेक वंचित वर्गांना उत्तरोत्तर अधिकाधिक कसे मिळेल याविषयी विचार करणे ही आपली प्रमुख जबाबदारी आहे ही गोष्ट वरिष्ठ वर्गांच्या लक्षात येईल.

(३) प्रगतिशील अर्थव्यवस्थेत एकाला वर चढविण्यासाठी दुसऱ्याला खाली ओढण्याची गरज नसते ही गोष्ट खरी असली तरी, पुरेशी दक्षता जर घेतली गेली नाही तर प्रगतीच्या प्रक्रियेत वर असणारे आणखी वर जातात व खालचे वर्ग तसेच दडपले राहण्याचा धोका निर्माण होतो. इंग्लंडच्या इतिहासात ही गोष्ट आपल्याला आढळून येते. ब्रिटिश साम्राज्य चालविण्यासाठी लागणाऱ्या अधिकारी वर्गाचा पुरवठा ब्रिटनमधील वरिष्ठ वर्गातून व इटन–हॅरो यासारख्या शाळा व ऑक्स्फर्ड–केंब्रिज यांसारखी विद्यापीठे यातूनच झाला. जसे अधिकारी वर्गाबाबत झाले त्याचप्रमाणे औद्योगिक विकासासाठी आवश्यक असणाऱ्या तंत्रज्ञ वर्गाबाबतही होऊ शकते. यासाठी एकूण समतेच्या, समाजवादी रचनेच्या दृष्टीनेही शिक्षणाची समान संधी सर्व वर्गांना लाभेल अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. समाजाचाही यात अंतिम अधिक फायदा आहे. कारण निवडीचे क्षेत्र व्यापक झाल्यामुळे समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रांत अधिक कसदार भरती अधिक मोठ्या प्रमाणावर करण्याची शक्यता निर्माण होते.

सामाजिक न्यायाच्या व सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीनेही आज अशी समान संधी सर्वांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आर्थिक लाभ व सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्याचा शिक्षण हा एकमेव मार्ग आहे अशी कनिष्ठ वर्गातील पालकांची निश्चित समजूत झालेली आहे. ही वस्तुस्थिती केवळ भारतातच आहे असे नव्हे तर इतर प्रगत समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांतही आहे. भारतासारख्या राष्ट्रात सामाजिक प्रतिष्ठेची ही भूक इतकी तीव्र असू शकते की एक वेळ आर्थिक लाभाचे निश्चित आश्वासन नसले तरी तेवढ्याने पालक आपल्या मुलाच्या शिक्षणविषयक प्रयत्नांपासून परावृत्त होत नाही. अशा वेळी, आर्थिक लाभ कसा होत नाही हे त्याला समजावून सांगून त्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा, आपले शिक्षण आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीनेदेखील उत्पादनक्षम कसे होईल याचा विचार करणे व त्यासाठी आवश्यक ती आपल्या शिक्षणप्रयत्नांची व आर्थिक नियोजनाची पुनर्रचना करणे या गोष्टी केल्या पाहिजेत.

**टीप** : शिक्षणाच्या आज अस्तित्वात असलेल्या रचनेत संधीची समता किंवा विषमता किती प्रमाणात अस्तित्वात आहे याचे काटेकोर शास्त्रशुद्ध मापन करण्याची पद्धती आपल्याला अद्याप उपलब्ध झालेली नाही. शिक्षणाच्या अर्थशास्त्राचा, शैक्षणिक खर्चाचा पाश्चात्य देशातून गेली दहा पंधरा वर्षे कसोशीने

अभ्यास चालू आहे. परंतु तरीही अजूनही त्यांनी ते तंत्र बसवलेले नाही. सर्व आर्थिक, सामाजिक संदर्भ लक्षात घेऊन करावयाच्या समान संधीच्या प्रयत्नाचे तंत्र त्यांनी अद्याप बसवलेले नाही याचे नवल नाही. कारण त्या विचारात येणाऱ्या कित्येक गोष्टी आकडेवारी मोजमापाच्या पलीकडे असण्याचीही शक्यता आहे. परंतु असे असले तरी, अशा अनेक अडचणींना तोंड देत अर्थशास्त्राने ज्याप्रमाणे राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याचे शास्त्र तयार केले, सर्वसामान्य भाववाढीची बदलती पातळी दाखवणारे निर्देशांक तयार केले, मजुरीचे दर ठरविताना त्या निर्देशांकांचा वापर केला जाऊ लागला, त्याच प्रकारे शैक्षणिक संधीचे मापन करण्याची पद्धत बसवली जाऊच शकणार नाही असे नाही. परंतु आज मात्र अगदी मर्यादित स्वरूपात देखील तसे मापन करणे अवघड होत आहे. अमेरिकेत कमीअधिक उत्पन्नाच्या प्रादेशिक विभागात (डिस्ट्रिक्टस्) समान संधीच्या तत्त्वाला अनुसरून सरकारतर्फे समानता अस्तित्वात आणणारी अनुदाने देण्यात येतात. परंतु तेथेही प्रत्यक्ष अनुदानाच्या रकमेची युक्तायुक्तता ठरवताना आज विषमतेचे असे मोजमाप अस्तित्वात नाही ही अडचण जाणवतेच. भारतासारख्या देशात ही गोष्ट विशेष बिकट, किंबहुना अशक्यप्राय, म्हणून त्या दिशेचा विचार बाजूला टाकण्याचा मोह होणे शक्य आहे. परंतु तो तसा टाळून चालणार नाही, तर तो अधिक कसोशीने केला पाहिजे.

चार

# असमान संधी : आर्थिक बाजू

समान संधीचा विचार करताना त्या प्रश्नाची आर्थिक बाजू आपल्यापुढे प्रामुख्याने येते व ही गोष्ट साहजिकही आहे. परंतु तेवढा मर्यादित विचार करतानाही आपण आर्थिक बाजूची सर्व अंगे विचारात घेतो असे नाही. आर्थिक विषमतेमुळे निर्माण होणाऱ्या शिक्षणविषयक संधीच्या विषमतेचा व त्यावरील उपाययोजनेचा आपण ज्या वेळी विचार करू लागतो त्या वेळी सामान्यपणे आपण फी माफी व काही अल्प शिष्यवृत्ती एवढ्यापर्यंतच सहसा येऊन थांबतो. गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना आर्थिक दृष्टचा खालील गोष्टींचा विचार करावा लागतो.

(१) **फीचा खर्च** : भारतात प्राथमिक शिक्षण मोफत आहे व इतर वरील शिक्षणाच्या बाबतीतही काही किमान उत्पन्नाच्या खाली उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील मुलांची फी सरकार भरते अशी तरतूद अनेक राज्यांतून आहे.

(२) **पाठ्यपुस्तके, वह्या, कागद यांसारख्या आवश्यक गोष्टींसाठी करावयाचा खर्च** : या खर्चाची तरतूद सहसा नसते. असलीच तर काही थोड्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत अल्प शिष्यवृत्तीच्या रूपात असते.[२]

(३) **कपडालत्ता, खाणेपिणे, विद्यालयात जाण्यायेण्यासाठी दैनंदिन व वार्षिक खर्च** : विद्यार्थी जसजसा मोठा होऊ लागतो तसतसा हा खर्च कुटुंबाच्या एकूण

---

२. शिक्षण महामंडळाने आपल्या अहवालात (पृ. ११३) पहिलीपासून अकरावीपर्यंत पाठ्यपुस्तके व लेखनसाहित्य यावर कराव्या लागणाऱ्या खर्चाचे किमान व कमाल आकडे एका पाहणीच्या आधारे दिले आहेत. कमाल आकडे इतके मोठे आहेत की ते श्रीमंत वर्गांच्यासाठी चाललेल्या अल्पसंख्य शाळांचे आहेत ही गोष्ट उघड आहे. किमान आकडे असे : ( रुपये व पैसे या क्रमाने ) पहिली १.१०, दुसरी १.१४, तिसरी २.८०, चौथी ५.३६, पांचवी ६.३१, सहावी १०.४८, सातवी १२.१७, आठवी १६.२५, नववी १८.६६, दहावी १८.५० व अकरावी २५.००. हे १९६५-६६ च्या पाहणीचे आकडे आहेत. त्यावर्षी भारताचे दर माणशी सरासरी राष्ट्रीय उत्पन्न सुमारे रु. ४२५ (१९६५-६६ च्या किमतींच्या प्रमाणात) होते. संपत्तीच्या विषम विभागणीमुळे बहुसंख्य जनतेचे प्रत्यक्ष उत्पन्न या सरासरीहून खूप खाली होते हे लक्षात घेतले तर या खर्चाचे शिक्षणाच्या संधीवर पडणारे प्रतिकूल दडपण लक्षात येईल.

खर्चात कुटुंबावर ताण न पडता सहजपणे बसू शकत नाही. एका कुटुंबात एकाच वेळी अनेक मुले शिकत असली तर, मग तर हा ताण विशेष जाणवल्याखेरीज रहात नाही. मागस जातींसाठी या प्रकारच्या खर्चाची काही तरतूद केलेली आहे. परंतु ती आज अपुरी आहे व इतर वर्गांसाठी तर तशी काहीच तरतूद नाही.

(४) मुलगा शिक्षण थांबवून व्यवसायात किंवा नोकरीत उतरला असता तर तो जे धनार्जन करू शकला असता, परंतु आज शिक्षण घेत असल्यामुळे जे धनार्जन त्याला करता येत नाही, तेही आपण विचारात घेतले पाहिजे. आर्थिक ओढगस्तीत असलेल्या कुटुंबाला हा ताणही जाणवत असतो. शिक्षणासाठी होणाऱ्या एकूण खर्चात या प्रकारच्या खर्चाचा समावेश करता येईल की नाही, त्यात तात्त्विक दृष्ट्या व व्यावहारिक दृष्ट्या कोणत्या अडचणी आहेत याचा विचार अभ्यासकांच्या (भारतातील व परदेशातीलही) वर्तुळात चालू आहे. परंतु या 'अनर्जित धना'चा विचार शिक्षणविषयक निर्णय घेत असताना गरीब कुटुंबांच्या मनात प्रखरपणे येत असतो ही गोष्ट प्रत्येकाच्या इतकी अनुभवाची झाली आहे की त्याविषयी अधिक विवेचन करण्याची गरज राहू नये. या 'अनर्जित धना'ची भरपाई पुढे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर होणाऱ्या अधिक मिळकतीतून होत असते असे सार्थपणे म्हणता येईल. परंतु हे माहीत असूनही मध्यंतरीच्या काळात या अर्जनाखेरीज कुटुंबाला तग धरण्याची शक्यता नसेल तर शिक्षण थांबविण्याखेरीज गत्यंतर नसते. कर्जाऊ शिष्यवृत्तीची तरतूद करून व ती रक्कम प्रत्येकाच्या गरजेप्रमाणे कमीअधिक करण्याची शक्यता ठेवून त्यातून मार्ग काढता येईल.[3]

आर्थिक दृष्ट्या समान संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने आपल्याला खूपच वाटचाल करावयाची आहे हे यावरून लक्षात येईल. शिक्षण महामंडळाने याविषयी केलेल्या सर्व सूचना अमलात आणल्या गेल्या तरीदेखील किती तरी कार्य करावयाचे शिल्लक राहील. केवळ प्राथमिक शिक्षणाचे उदाहरण घेतले तरी ही गोष्ट स्पष्ट

३. बँकांच्या मार्फत अशी कर्जे देण्याचा प्रयत्न अमेरिकेसारख्या राष्ट्रांत केला जात आहे. शिक्षण-संस्था चालकांच्या शिफारसीवर बँक असे कर्ज देते. ही शिफारस गुणवत्तेच्या आधारे केली जाते. शिक्षण संपल्यानंतर तीन वर्षांच्या मुदतीत हे कर्ज पुन्हा वसूल केले जाते. बँकेला हमी या योजनेसाठी अस्तित्वात असलेल्या मंडळाची असते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बेकार राहण्याची पाळी येणार नाही अशी ज्या देशात वा ज्या व्यवसायक्षेत्रात परिस्थिती असेल तेथे अशी योजना सुलभपणे कार्यवाहीत आणण्याची शक्यता असते.

होईल. प्राथमिक शिक्षण मोफत, सार्वत्रिक, सक्तीचे करण्याचा आपला हेतू असल्यामुळे ते उदाहरण सर्वांत अधिक उपयोगी होऊ शकेल. आजही ते शिक्षण सर्व मुलांच्या पर्यंत जाऊन पोहोचू शकलेले नाही. मुलींचे प्रमाण तर अर्थात् त्याहूनही कमी आहे. पहिलीत प्रवेश घेऊन चौथी व सातवीपर्यंत टिकून राहणारे थोडे आहेत. अनेक शाळांचा दर्जा निकृष्ट आहे आणि यामुळे अधिक सुस्थितीत असलेल्या कुटुंबातील पालक फी आकारणाऱ्या स्वतंत्र शाळांतून आपली मुले पाठवीत असतात. या खाजगी शाळा बंद कराव्यात व सर्वांना सार्वजनिक शाळातच आपली मुले पाठविणे भाग पाडावे असा विचार काही जणांनी आग्रहाने शिक्षण महामंडळापुढे मांडला होता. त्यामुळे समान संधी अस्तित्वात येईल व वरिष्ठ वर्गातील लोकांचे लक्ष सर्वच प्राथमिक शिक्षण सुधारण्याकडे लागेल अशी त्यामागची विचारसरणी होती. असा विचार संपूर्ण समाजवाद अस्तित्वात आल्याखेरीज अमलात येणे अशक्य आहे. संपूर्ण समाजवादी व्यवस्थेतही काही चांगल्या शिक्षणसंस्था व काही कनिष्ठ संस्था असा भेद राहणे अटळ आहे. राष्ट्राकडची साधनसंपत्ती अपुरी आहे तोपर्यंत तर अटळ आहेच आहे. परंतु समाजवादी अर्थव्यवस्थेत चांगल्या शाळांतून मिळणारा प्रवेश हा पालकांच्या फी देण्याच्या कुवतीवर मिळणार नाही तर मुलाच्या गुणवत्तेवर मिळेल. असा फरक राहील व राहिला पाहिजे.

भारतात आर्थिक परिस्थितीचा शिक्षणाच्या समान संधीवर कसा परिणाम होतो याचे फारसे अभ्यास झालेले नाहीत. शिक्षण महामंडळाने एका पाहणीचे निष्कर्ष आपल्या अहवालात दिलेले आहेत ते असे : (पृष्ठ २० वरील तक्ता पहा)

या पाहणीमध्ये किती संस्थांची पाहणी करण्यात आली याचा निर्देश अहवालात आहे. परंतु एकूण किती संस्थांपैकी किती संस्थांची पाहणी झाली ही माहिती नाही. तसेच ही माहिती गोळा करताना प्रवेशाच्या वेळी भरमसाट डोईकर (Capitation Fee) आकारणाऱ्या सर्व संस्थांचा समावेश पाहणीत झालेला आहे की नाही हेही स्पष्ट नाही. (अहवालाच्या पुरवणीतील निबंधात कदाचित ती माहिती असेलही. परंतु सध्या तो भाग प्रकाशित नाही.) परंतु तरीही आहेत ते आकडे पुरेसे बोलके आहेत. शेतकी महाविद्यालय, पॉलिटेक्निक, इंडस्ट्रिअल ट्रेनिंग इन्स्टिटयूट यांसारख्या अनाकर्षक किंवा तंत्रज्ञानात खालच्या पातळीच्या शिक्षणक्रमाकडे गरीब विद्यार्थ्यांचा भरणा आढळून येतो तर आय. आय. टी. सारख्या आज इंजिनिअरिंगच्या शिक्षणात भारतात सर्वोत्कृष्ट असणाऱ्या संस्थांत जवळ जवळ साठ टक्के

**तक्ता १ – धंदेशिक्षण, तांत्रिक शिक्षग व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांतून १९६५ मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची पालकांच्या उत्पन्नाप्रमाणे वर्गवारी**[४]

| संस्था | पालकांचे उत्पन्नाप्रमाणे विद्यार्थ्यांची टक्केवारी | | | | पाहणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | मासिक रु. १५० च्या खाली | मासिक रु. १५१ ते ३०० | मासिक रु. ३०१ ते ५०० | मासिक रु. ५०० च्या वर | |
| आय्. आय्. टी. | ६·९ | १३·८ | २०·६ | ५८·७ | २,५७४ (१००%) |
| विभागीय इंजिनिअरिंग महाविद्यालये | ३२·९ | २५·६ | २३·८ | १७·७ | २,४२५ (१००%) |
| इंजिनिअरिंग महाविद्यालये | ३८·७ | २९·१ | १९·६ | १२·६ | १५,१४४ (१००%) |
| वैद्यकीय महाविद्यालये | ३०·८ | २३·५ | १९·६ | २६·१ | ६,११८ (१००%) |
| शेतकी महाविद्यालये | ५८·७ | २६·८ | १०·७ | ३·८ | २,८१८ (१००%) |
| पॉलिटेक्निक | ५५·८ | २५·४ | ११·८ | ७·० | ४७,९०० (१००%) |
| इंडस्ट्रिअल ट्रेनिंग इंस्टिटयूटस | ८३·० | १५·३ | १·५ | ०·२ | ७,३९९ (१००%) |
| इतर धंदेशिक्षण संस्था | २७·९ | ३७·७ | २०·८ | १३·६ | २,९८० (१००%) |

४. शिक्षण महामंडळाचा अहवाल, तक्ता क्र. ६·४ (पृ. ११९) वरून

विद्यार्थी मासिक पाचशे रुपयांहून अधिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या कुटुंबातून येत असतात. या संस्थांत होणारी भरती ही एका विशेष परीक्षेत अखिल भारतात स्पर्धक विद्यार्थ्यांची चाचणी घेऊन गुणानुक्रमे केली जाते. हे लक्षात घेतले तर आर्थिक परिस्थितीचा गुणानुक्रमावरही कसा परिणाम होत असतो ते लक्षात येईल. आय. आय. टी. त दाखल होणारे केवळ तेरा टक्के विद्यार्थी ग्रामीण भागातील असतील, तर ८७ टक्के विद्यार्थी नागरी विभागातील असतात. नागरी भागांतील अधिक चांगल्या शाळा व महाविद्यालये यांचा लाभ त्यांना मिळत असतो. त्याचप्रमाणे कौटुंबिक सुस्थितीमुळेही त्यांच्या पूर्ण विकासाला अधिक अनुकूल वातावरण लाभत असते. मासिक दीडशे रुपयांहून कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण भारतात शेकडा सुमारे ऐंशी आहे. या प्रचंड विभागातून आय. आय. टी. मध्ये सात टक्क्यांहूनही कमी विद्यार्थी भरती होतात. हे लक्षात घेतले म्हणजे शिक्षणाच्या समान संधीविरोधी आर्थिक विषमतेचा होणारा परिणाम दूर करण्यासाठी आपल्याला केवढा प्रयत्न करावयाचा आहे व किती अंतर तोडावयाचे आहे हे लक्षात येईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७८२०० दि.
क्रमांक ९५५१ नोंद दि. निबंध
२५।३।८८

पाच

# असमान संधी : सामाजिक बाजू

आर्थिक विषमतेइतकीच, किंबहुना त्याहूनही अधिक, सामाजिक विषमता ही शिक्षणातील समान संधीला मारक असते ही गोष्ट आपल्या अनेकदा लक्षात यत नाही किंवा आली तरी या क्षेत्रात निश्चित असे काही करता येणे शक्य नाही या भावनेने आपण या गोष्टीची नोंद घेऊन पुढे जात असतो. विद्यार्थ्यांचा संपूर्ण गुण-विकास होण्यासाठी आर्थिक अनुकूलतेहूनही कुटुंबातील शैक्षणिक परंपरा व वातावरण ही अधिक उपयोगी असतात. हे वातावरण असेल तर विद्यार्थी इतर अनुकूलता मिळताच झपाटयाने प्रगती करू शकतात, तर याउलट तसे वातावरण नसेल तर महत्प्रयासानेही त्या वर्गांत शिक्षणप्रसार करणे कठीण होऊन बसते; व शिक्षण प्रसार झाला तरी उपजत कुशाग्र बुद्धीच्या विद्यार्थ्यांचेही संपूर्ण तेज विकास पावू शकत नाही; व आपण जी सामान्यपणे खुली चढाओढ म्हणतो त्या चढाओढीत अधिक संस्कारित कुटुंबातून येणाऱ्या तेवढयाच उपजत बुद्धीच्या किंवा काही कमी बुद्धीच्याही विद्यार्थ्यांशी होणाऱ्या तुलनेत गुणपत्रिकेत मिळणाऱ्या गुणात तो उणा ठरतो. आणि केवळ त्या गुणपत्रिकेवर पुढील सर्व प्रवेश ठरत असतील तर भावी उत्कर्षाची अनेक दारे त्याला बंद होतात.

या वातावरणाचा हा परिणाम कसा होतो याचाही तपशीलवार विशेष अभ्यास झाला नसला तरी ती गोष्ट सहजपणे सिद्ध करता येण्यासारखी आहे. स्त्रीशिक्षणाला उच्चवर्णीयांतही अलीकडे तीस चाळीस वर्षांतच खऱ्या अर्थाने चालना मिळाली. एक काळ असा होता की, न्यायमूर्ती रानडे यांच्यासारख्या उदारमतवादी व्यक्तीला चोरूनच आपल्या पत्नीला लिहायला वाचायला शिकवावे लागत होते. परंतु हा सामाजिक प्रतिबंधाचा अडसर दूर झाल्यानंतर त्या वर्गात स्त्रीशिक्षणाचा झपाटयाने प्रसार झाला. इतकेच नव्हे तर गुणवत्तेच्या बाबतीत विद्यार्थिनी या विद्यार्थ्यांपेक्षा कमी असतात असा अनुभव आला नाही. कारण एकाच कौटुंबिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीतून हे विद्यार्थी व ह्या विद्यार्थिनी येत होत्या.[५] परंतु

---

५. आजहि विद्यार्थ्यांच्या मानाने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या प्रत्येक पातळीवर कमीच [ टीप पुढील पानावर चालू ]

याच्या उलट वर्गीकृत जाती व जमातींच्या शिक्षणाचा प्रयत्न होऊनही त्यांच्यातील शिक्षणप्रसारही अपुरा राहिलेला आहे व त्या वर्गातून वरच्या क्रमांकांना येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तर अपवादात्मक अल्प अशी आहे. वर्गीकृत जमातींचे राज्याच्या एकूण लोकसंख्येतील प्रमाण व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांत या जमातीतील विद्यार्थ्यांचे प्रमाण पाहिल्यास ही गोष्ट स्पष्ट होईल. या जमातींची वस्ती विशेष असणाऱ्या काही राज्यांतील आकडे असे.[६] (आकडे १९६१ सालचे आहेत.)

| राज्य | एकूण लोकसंख्येशी वर्गीकृत जमातींचे प्रमाण | उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांत वर्गीकृत जमातींच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण |
|---|---|---|
| आन्ध्रप्रदेश | ३.७ | ०.४ |
| आसाम | १७.४ | ९.८ |
| बिहार | ९.१ | २.४ |
| गुजरात | १३.३ | ०.२ |
| मध्यप्रदेश | २०.६ | २.२ |
| महाराष्ट्र | ६.१ | ०.६ |
| राजस्थान | ११.५ | ०.५ |
| पश्चिम बंगाल | ५.९ | ०.३ |

लोकसंख्येतील प्रमाणाशी तुलना करता उच्च शिक्षण घेऊ शकणाऱ्या वर्गीकृत जमातीतील विद्यार्थ्यांचे प्रमाण असावयास हवे त्याच्या दहा टक्केही अनेक राज्यांतून नाही ही गोष्ट यावरून आढळून येते. गुजरात, राजस्थान, पश्चिम बंगाल

[ मागील पानावरून ]

आहे. परंतु याचे कारण, आपल्या सामाजिक परिस्थितीत वरिष्ठ वर्गांतहि स्त्रीला अजून पुरुषापेक्षा गौण स्थान आहे व खालच्या वर्गांत स्त्रीशिक्षणाविषयीची मनोभूमिकाहि अद्याप पूर्णपणे तयार व्हावयाची आहे, हे आहे. १९६५-६६ मध्ये शिक्षण घेणाऱ्या शंभर विद्यार्थ्यांच्या बरोबर शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण विविध पातळ्यांवर खालील प्रमाणे होते. पहिली ते पाचवी : ५५; सहावी ते आठवी : ३५; नववी ते अकरावी : २६; महाविद्यालये : २४; शालेय पातळीवरील उद्योगशिक्षण : २३; महाविद्यालयीन पातळीवरील व्यावसायिक शिक्षण : १४.

६. शिक्षण महामंडळाच्या अहवालामधील टेबल ६.८ वरून संकलित ( पृ. १४० ).

यांसारख्या राज्यांत तर ते याहूनही कितीतरी प्रमाणात कमी आहे. अपवाद फक्त बिहार व आसाम राज्यांचा. बिहारमध्ये ते असावयास हवे त्याच्या सुमारे पंचवीस टक्के आहे. आसाममध्ये सुमारे साठ टक्के आहे.

कुटुंबाच्या सामाजिक स्थानावर अवलंबून असणारी ही संधीची विषमता गेल्या प्रकरणात आपण आर्थिक संदर्भात पाहिली त्याच प्रकारच्या आकडेवारीवरून आढळून येते. उच्च तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची कुटुंबांच्या व्यवसायाच्या दृष्टीने वर्गवारी पुढीलप्रमाणे आढळून येते. (पृष्ठ २५ वरील तक्ता पहावा.)

ग्रामीण भाग हा सामाजिकदृष्टचा सामान्यपणे मागास किंवा अप्रगत असे जर आपण मानले, (आणि तसे मानावयास किंतु वाटू नये,) तर वरील संस्थांतील सर्वांत महत्त्वाच्या संस्थांत या सामाजिक विभागाला कसे प्रमाणातीत कमी प्रतिनिधित्व मिळते ते लक्षात येईल. व्यवसायात्मक विभागणीप्रमाणेही हीच गोष्ट आढळून येते. उच्च व्यावसायिक, नोकरदारवर्ग यांना त्यांच्या लोकसंख्येतील प्रमाणापेक्षा कितीतरी अधिक संधी मिळते. याउलट शेतकरी वर्गाला त्याच्या लोकसंख्येतील प्रमाणाच्या तुलनेत फारच कमी संधी मिळते. सामाजिक स्तरांप्रमाणे व आर्थिक स्तरांप्रमाणे आपल्या समाजाच्या ज्या चौकटी पडतात त्यात वरून खाली सामाजिक श्रेष्ठतेच्या पातळीप्रमाणे उतरत गेले व उजवीकडून डावीकडे आर्थिक श्रेष्ठतेच्या पातळीप्रमाणे उतरत गेले तर वरच्या डाव्या कोपऱ्यातील चौकटीत (सर्वोच्च सामाजिक स्थिती व सर्वोच्च आर्थिक स्थिती) शिक्षणाची संधी उत्कटपणे केंद्रित झालेली दिसेल समाजात सामान्यपणे उपलब्ध असलेल्या संधीचा उपयोगही याच चौकटीतले लोकच सर्वाधिक करून घेतात असे आढळून येईल. या उलट सर्वांत खालची उजव्या कोपऱ्यातील चौकट जर घेतली (निकृष्ट सामाजिक स्थिती व निकृष्ट आर्थिक स्थिती—भूहीन हरिजन, व्यवसायहीन गिरिजन) तर त्या चौकटीत शिक्षणाच्या संधीची केवळ विषमता आहे एवढेच नव्हे तर त्या चौकटीला शिक्षणविषयक प्रयत्नाचा पुसटसादेखील स्पर्श झालेला नाही असे आढळून येईल.

या चौकटीच कशा नाहीशा होतील हा खरोखर समाजवादी समाजरचनेपुढील मुख्य प्रश्न आहे. परंतु त्या जोपर्यंत अस्तित्वात आहेत तोपर्यंत या चौकटीत उपलब्ध असणारी वेगवेगळी शिक्षणाची असमान संधी समान कशी करता येईल या प्रश्नांचा विचार तरी निकडीने करणे भाग आहे. ही संधी जसजशी समान होत

**तक्ता २ – धंदेशिक्षण, तांत्रिक शिक्षण व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांतील विद्यार्थ्यांची ग्रामीण-नागरी व पालकांच्या व्यवसायानुसार विभागणी**[७]

| संस्था | विद्यार्थ्यांची टक्केवारी | | | | | | | पाहणी केलेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | पालकांच्या व्यवसायानुसार | | | | | |
| | | | उच्च व्यावसायिक | कनिष्ठ नोकरदार | व्यापार | शेती | इतर | |
| आय्. आय्. टी. | १२·८ | ८७·२ | ७·२ | ६१·२ | २०·१ | ४·३ | ७·२ | २,५७४ (१००%) |
| विभागीय इंजिनिअरिंग महाविद्यालये | ४१·२ | ५८·८ | १०·९ | ३७·३ | १७·७ | २३·९ | १०·२ | २,४२५ (१००%) |
| इंजिनिअरिंग महाविद्यालये | ३४·१ | ६५·९ | ८·७ | ३४·६ | २१·२ | २२·४ | १३·१ | १५,१४४ (१००%) |
| वैद्यक महाविद्यालये | ३१·८ | ६८·२ | १७·१ | ३२·९ | १७·९ | २१·४ | १०·७ | ६,११८ (१००%) |
| शेतकी महाविद्यालये | ५९·० | ४१·० | ४·९ | २७·४ | ७·० | ५८·३ | २·४ | २,८१८ (१००%) |
| पॉलिटेक्निक | ४४·४ | ५५·६ | ७·७ | ३२·० | १९·१ | २८·६ | १२·६ | ४७,९०० (१००%) |
| इंडस्ट्रिअल ट्रेनिंग इन्स्टिटच्यूटस | ५८·८ | ४१·२ | ४·२ | १८·६ | १२·५ | ४३·१ | २१·६ | ७,३९९ (१००%) |
| इरत धंदेशिक्षण संस्था | ३१·७ | ६८·३ | ११·३ | ३८·६ | २२·४ | १६·० | ११·७ | २,९८० (१००%) |

७. शिक्षण महामंडळ अहवाल, तक्ता क्र. ६.४ (पृ. ११९) वरून.

जाईल तसतसे विषमतेचे उभे आडवे ताणही ढिले होत जातील व चौकटी लयाला जावयासही महत्त्वाची मदत होईल. आजही काही प्रमाणात ही प्रक्रिया सुरू झालेली आहे, परंतु ती अधिक जागरूक व आग्रही झाली पाहिजे.

सामाजिक विषमतेचा शिक्षणाच्या समान संधीवर होणाऱ्या परिणामाचा मी विचार करतो तेव्हा काही वर्षांपूर्वी एका परदेशी नियतकालिकातील जाहिरातीत पाहिलेल्या मुलाचे चित्र माझ्या डोळ्यांसमोर येते. पाचसहा वर्षांच्या, पाटी–दप्तर घेऊन शाळेत जाणाऱ्या एका गरीब मुलाचे ते पाठमोरे चित्र होते. खाली निर्देश होता. ' Ali is five thousand years late to school ' '(अलीला शाळेत जावयास पाच हजार वर्षे उशीर झालेला आहे. ')त्या चार रेषातील आणि त्या चार शब्दातील कारुण्य कोणाच्याही अंतःकरणाला भिडल्यावाचून राहू शकेल असे मला वाटत नाही.

भारतात आज असे कोटचवधी अली आहेत, राम आहेत, सिंग आहेत, इतरही आहेत. सर्व धर्मात आहेत, सर्व राज्यांत आहेत. साधी साक्षरताही आपण अद्याप सार्वत्रिक करू शकलो नाही. प्रौढ निरक्षर सोडले तरी शाळेत जावयाचे वय असलेल्या सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण पूर्ण देत आहोत असे नाही. मुलांना नाही; मुलींना तर त्याहूनही नाही. प्राथमिक शिक्षण केवळ सक्तीचे, मोफत करून हा प्रश्न सुटत नाही. पहिलीत येणारी मुले चौथीपर्यंत मोठ्या प्रमाणात का गळतात, अर्धवट शिक्षणाचे संस्कार लवकर कसे पुसून जातात, त्याच्यावर काय उपाययोजना करता येईल याचा विचार झाला पाहिजे.

पाच हजार वर्षे ज्या कुटुंबांतून ज्ञानदीप कधी लागला नाही त्या कुटुंबांतून आपल्याला ज्ञानदीप लावावयाचा आहे. ज्ञानार्जनाची समान संधी निर्माण करावयाची आहे. सुदैवाची गोष्ट एवढीच आहे की पाच हजार वर्षांचे हे अंतर तुटावयास पुन्हा पाच हजार वर्षांच्या काळाची गरज नसते. दोन पिढ्यांच्या कालावधीत हे अंतर बहुतांशाने काटता येते. कोणत्याच देशात आज ते पूर्णांशाने तुटलेले नाही.[८] परंतु त्याच बरोबर, आज ज्या प्रमाणात ही विषमता अस्तित्वात आहे ती

८. अमेरिकेसारख्या राष्ट्रातही आज इतकी समृद्धी, इतका शिक्षणाचा प्रसार असल तरी निरक्षर लोकांच्या प्रश्नाचा विचार त्यांना करावा लागतो. अमेरिकेतील शिरगणना खात्याच्या पाहणीप्रमाणे १९५९ मध्ये अमेरिकेत अठ्ठावीस लक्ष पन्नास हजार लोक संपूर्णपणे निरक्षर होते. दुसऱ्या महायुद्धाच्या

[ टीप पुढील पानावर चालू ]

तशी ठेवून आपण समाजवादी समाजरचनेचे प्रवर्तक आहोत असा दावा करण्याचाही, तसेच मोठे मनोधैर्य असल्याखेरीज, कोणाचा धीर होऊ शकणार नाही.

---

[ मागील पानावरून ]

काळात ४ लाख निरक्षर लोकांना सैन्यात दाखल करून घेण्यात आले होते. सैन्यात दाखल केल्यानंतर सेनेच्या गरजेप्रमाणे त्यांना आवश्यक ते किमान शिक्षण देण्यात आले. सैन्यात भरती करण्यासाठी एक कोटी ऐंशी लाख लोकांची पाहणी करण्यात आली होती. त्यांपैकी वीस लाख लोक पूर्णपणे किंवा बहुतांशाने निरक्षर होते, असे आढळून आले.

अमेरिकेतील १९६० च्या शिरगणनेप्रमाणे २५ वर्षे वयाच्या वरील लोकसंख्येपैकी ८३ लक्ष लोकांचे ( ४५ लक्ष पुरुष व ३८ लक्ष स्त्रिया ) पाच वर्षांपेक्षा कमी शिक्षण झालेले होते. २५ वर्षे वयाच्या वरील गटातील एकूण लोकसंख्येशी हे प्रमाण ८ टक्क्यांहूनहि अधिक होते. पाच वर्षांहून कमी शिक्षण झालेल्यांपैकी अनेक लोक खऱ्या अर्थाने जवळजवळ निरक्षरच ( functionally illiterate ) असतात. तसेच, श्वेतवर्णीय अमेरिकन लोकांशी तुलना करता नीग्रो लोकांत निरक्षरतेचे प्रमाण जवळजवळ चौपट असते असे आढळून आले.

या निरक्षरतेची कारणमीमांसाही देण्यात आली आहे. ती अशी : काही वेळा शाळेत जाण्याची संधीच न मिळाल्यामुळे माणूस निरक्षर राहिला असे आढळून येते. परंतु बहुतेक वेळा तो शाळेत दाखल झालेला असतो परंतु त्याचे शिक्षण अपुरे झालेले असते. शाळेत उपस्थित राहण्याची सक्ती करणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी कसोशीने झालेली नसते. वर्ग फार मोठे असतात. भटका मजूरवर्ग, अल्पसंख्य जमाती, इतर निकृष्ट परिस्थितीतील वर्ग यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविले न गेल्यामुळेही असा परिणाम घडून येत असतो.

" यासाठी प्रत्येक मुलाला एक चांगली शाळा उपलब्ध असेल अशी तरतूद आपण केली पाहिजे. विविध प्रवृत्तीच्या विद्यार्थ्यांना रस वाटेल असे अभ्यासक्रम असले पाहिजेत. सक्तीच्या उपस्थितीविषयी दक्षता घेतली पाहिजे. असे केले तरच वंशभेदामुळे, पालकांच्या औदासिन्यामुळे, सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अपुरे राहिले असे होणार नाही.

" शिक्षणाच्या समान संधीचे आपले ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीनेही ही गोष्ट आवश्यक आहे. निरक्षर लोक बेकार राहतात व सरकारलाच त्यांना पोसण्याचा भार उचलावा लागतो हे लक्षात घेतले तर शिक्षणावर केलेला खर्च सरकारच्या दृष्टीने काटकसरीचाच मार्ग ठरण्याची शक्यता आहे हे दिसून येईल. "

( Changing Demands of Education and their Fiscal Implications, National Committee for Support of the Public Schools, 1963, पृ. ४६ ते ५१. )

रशियातही काही प्रमाणात निरक्षरता अस्तित्वात आहेच. १९५९ मध्ये ९ ते ४९ या वयोगटाच्या पुरुषांपैकी ०.७ टक्के पुरुष निरक्षर होते तर त्याच वयोगटातील स्त्रियांपैकी २.२ टक्के स्त्रिया निरक्षर होत्या. ( Encyclopaedia of Russia and the Soviet Union, Ed. M. T. Florinsky, 1961, पृ. १५१).

बेकारांना पोसण्याचा भार भारत सरकार अजून उचलत नाही. परंतु इतर सर्व बाबतीत आपण अमेरिकेच्या या अनुभवावरून काही निश्चित घेण्यासारखे आहे. कार्यक्रमाची दिशा त्यातून सूचित होते व त्याबरोबर प्रगतीच्या आपल्या अपेक्षा पूर्ण होण्यात किती अडचणी असतात त्याचीही जाणीव होते.

सहा

# असमान संधी : प्रादेशिक बाजू

आर्थिक विषमता व सामाजिक विषमता यांचा परिणाम शिक्षणविषयक संधीच्या समानतेवर कसा प्रतिकूल होतो ते आपण पाहिले. राष्ट्रात सर्व घटकराज्यांतून किंवा प्रत्येक राज्यांतील सर्व प्रदेशांत आर्थिक व सामाजिक परिस्थिती एका पातळीत सहसा नसते. या विषमतेच्या परिणामामुळे प्रत्येक राष्ट्रात काही घटक राज्ये शैक्षणिक विकासात अधिक प्रगत तर काही अधिक मागस असे आढळून येते. तसेच प्रत्येक राज्यातही काही प्रदेश अधिक प्रगत व काही मागस असे आढळून येते.

आर्थिक व सामाजिक कारणांबरोबरच सरकारचे धोरण शिक्षणविकासाला किती अनुकूल व कार्यक्रमाच्या आखणीत कितपत सुजाण आहे यावरही ही गोष्ट अवलंबून असते. शिक्षणविषयक आस्था नसणारे सरकार असेल तर शिक्षणावर पुरेसा खर्च होणार नाही. ही आस्था हादेखील एक दृष्टिकोनाचा भाग आहे. शिक्षण ही एक केवळ निकडीची सामाजिक भूक आहे व ती भागविली पाहिजे एवढाच शिक्षणाचा उपभोगात्मक विचार न करता, त्याइतकाच किंवा त्याहूनही अधिक, राष्ट्राच्या आर्थिक अभ्युदयाचा पाया म्हणून भांडवल या दृष्टीने शिक्षणाकडे व त्यावर होणाऱ्या खर्चाकडे पाहिले पाहिजे, हा विचार राज्यकर्त्यांच्या मनात पक्का रुजला पाहिजे. पाश्चात्य राष्ट्रांतही हा विचार प्रभावीपणे पुढे मांडला जावयास अलिकडेच सुरुवात झालेली आहे. आपल्याकडे त्या विचाराने अद्याप मूळ धरावयाचे आहे.

केला जाणारा खर्च हाही योग्य रीतीने होत नसेल तर जितके फळ एऱ्हवी मिळावयास हवे होते त्याहून कमी फळ मिळेल. शिक्षणाचा प्रसार, शिक्षणाचा कस, शिक्षणसंस्थांचे स्थाननियोजन (location), शिक्षणक्रमांची रचना, अनुदानपद्धती, शिक्षणप्रशासन या विषयींचे धोरण जर योग्य रीतीने आखलेले नसेल तर खर्च करूनहि त्यातील पुष्कळ अपव्यय ठरण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे, केला जाणारा खर्च हा मागस विभागांना इतरांच्या बरोबर आणण्याच्या दृष्टीने करण्याची विशेष दृष्टी ठेवली नसली, किंवा राजकीय वा इतर कारणांनी ठेवता आलेली नसली, तरी वेगवेगळ्या प्रदेशांतील शैक्षणिक विकासाची विषमता कमी होत नाही, किंबहुना वाढतही जाते.

हे होऊ नये यासाठी केंद्र सरकारने राज्याराज्यांतील शैक्षणिक विकासाची विषमता कमी करण्याचा प्रयत्न करीत राहिले पाहिजे. यासाठी मध्यवर्ती अनुदानांची नीट योजना केली पाहिजे. राज्यसरकारांचे धोरण शिक्षणप्रयत्नाला पुरेसे पोषक नसेल तर ते तसे करण्याचा प्रयत्न केला पाहिजे व राज्यांच्याकडे असलेल्या व त्यांना उपलब्ध पैशाचा योग्य रीतीने विनियोग होण्याविषयी दक्षता घेतली पाहिजे. राज्यांतर्गत प्रदेशांच्या किंवा जिल्ह्यांच्या शैक्षणिक समविकासासाठी राज्य-सरकारांनीही अशीच दक्षता घेतली पाहिजे.

शिक्षण महामंडळाने आपल्या अहवालात भारतातील राज्याराज्यांतील शैक्षणिक विषमता दाखवणारा एक तक्ता (पृ. ३१ व ३२ पहा) दिला आहे. तो उद्‌बोधक आहे. महामंडळाने निर्देश न केलेल्या एकदोन गोष्टी मात्र हा तक्ता पाहताना लक्षात ठेवणे इष्ट होईल. एकतर निरक्षरांचे एक हजार लोकसंख्येशी प्रमाण देण्याऐवजी (स्तंभ ५ व ६) ते नऊ वर्षे वयाच्या वरील लोकसंख्येतील हजाराशी प्रमाण असे काढून दिले असते तर अधिक स्पष्ट कल्पना येऊ शकली असती. तसेच आपले कुतूहल साहजिकच महाराष्ट्राविषयी अधिक असणार. महाराष्ट्राचा दर डोई उत्पन्नाचा आकडा तर सर्व भारतात पहिल्या क्रमांकाचा आहे. या ठिकाणी महाराष्ट्राच्या अर्थकारणातील मुंबईचा प्रभाव आपण ध्यानात ठेवला पाहिजे. हे लक्षात घेतले तरच इतर दरिद्री महाराष्ट्राचे काही विशेष प्रश्न आहेत हे ध्यानात येते.

या तक्त्यावरून खालील ठळक गोष्टी आढळून येतील. राज्याच्या उत्पन्नापैकी ओरिसा शिक्षणावर सर्वांत कमी खर्च करतो (१·५ टक्के) तर केरळ सर्वांत अधिक करतो (३·६ टक्के). याच अनुषंगाने निरक्षरतेचे प्रमाण (पुरुष व स्त्रिया या दोघांच्याही संदर्भात) अखिल भारतात केरळ राज्यातच सर्वांत कमी आहे. साहजिकच प्राथमिक शाळांतील भरतीचे प्रमाणही केरळमध्येच मुलांच्या व मुलींच्याही बाबतीत भारतात सर्वांत अधिक आहे. मुलांच्या बाबतीत केरळमध्ये त्या वयाच्या गटातील मुलांच्या संख्येशी हे प्रमाण ११५·४ टक्के आहे. (अधिक वयाचेहि काही विद्यार्थी त्या वर्गात राहिलेले असतात). मुलांच्या बाबतीत हे प्रमाण १०० टक्के आहे. उच्च प्राथमिक ते आठवी मध्येही मुलांच्या व मुलींच्या बाबतीत केरळचाच पहिला क्रमांक येतो (मुलांचे प्रमाण : ६७·७ टक्के, मुलींचे प्रमाण : ४९·१ टक्के ), व ओरिसाचा क्रमांक भारतात शेवटचा येतो ( मुलांचे प्रमाण : १६·१ टक्के, मुलींचे प्रमाण : २

**तक्ता ३ – भारतातील विविध राज्यांतील शिक्षणविषयक प्रयत्नांची**

| राज्य | दरडोई उत्पन्न रु. | शिक्षणा-वरील दरडोई खर्च रु. | राज्याच्या उत्पन्नाशी शिक्षणा-वरील खर्चाचे प्रमाण % | निरक्षरांचे प्रमाण दर हजारात | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्रिया |
| आंध्र | २८७.० | ७.१ | २.५ | ६९८ | ८८० |
| आसाम | ३३३.३ | ७.६ | २.३ | ६२७ | ८४० |
| बिहार | २२०.७ | ४.९ | २.२ | ७०२ | ९३१ |
| गुजरात | ३९३.४ | ९.२ | २.३ | ५८९ | ८०९ |
| काश्मीर | २८९.० | ५.७ | २.० | ८३० | ९५७ |
| केरळ | ३१४.९ | ११.५ | ३.६ | ४५० | ६११ |
| मध्य प्रदेश | २८५.४ | ६.२ | २.२ | ७३० | ९३३ |
| मद्रास | ३३४.१ | ९.४ | २.८ | ५५५ | ८१८ |
| महाराष्ट्र | ४६८.५ | १२.४ | २.६ | ५८० | ८३२ |
| म्हैसूर | ३०४.७ | ७.५ | २.५ | ६३९ | ८५८ |
| ओरिसा | २७६.२ | ४.३ | १.५ | ६५३ | ९१४ |
| पंजाब | ४५१.३ | ९.३ | २.१ | ६७० | ८५९ |
| राजस्थान | २६७.४ | ६.३ | २.४ | ७६३ | ९४२ |
| उत्तर प्रदेश | २९७.४ | ५.४ | १.८ | ७२७ | ९३० |
| प. बंगाल | ४६४.६ | ९.८ | २.१ | ५९९ | ८३० |
| अखिल भारत | ३३४.५ | ७.८ | २.४ | ६५५ | ८७० |

कुवत, त्या प्रयत्नांचे प्रमाण व त्यांचे फलित (१९६०–६१)[९]

| प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे त्या टप्प्यातील वयोगटातील एकूण विद्यार्थ्यांशी प्रमाण | | | | | | उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण (दर दहा हजार लोकसंख्येत) |
|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता १ ते ५ | | इयत्ता ५ ते ८ | | इयत्ता ९ ते ११ | | |
| मुले % | मुली % | मुले % | मुली % | मुले % | मुली % | |
| ८४·३ | ५२·२ | २६·१ | ७·६ | १४·४ | २·७ | १६ |
| ८४·७ | ५०·४ | ३६·४ | १४·६ | २५·५ | ७·० | २३ |
| ७६·० | २४·१ | २९·३ | ३·७ | २१·५ | १·६ | २० |
| ९०·१ | ५२·९ | ३६·६ | १५·२ | १९·० | ६·२ | २४ |
| ७१·० | २०·७ | ३७·९ | ९·५ | १४·५ | ४·७ | २५ |
| ११५·४ | १००·० | ६७·७ | ४९·१ | २०·२ | १२·६ | २६ |
| ७५·० | २२·४ | २५·६ | ५·४ | ११·२ | २·० | १५ |
| १०४·८ | ६५·९ | ४४·४ | १९·१ | १९·५ | ६·३ | २१ |
| ९५·१ | ५८·४ | ३९·२ | १५·३ | २०·३ | ६·७ | २८ |
| ९१·९ | ५५·३ | ३२·३ | १२·५ | १७·४ | ४·८ | २२ |
| ८९·३ | ३९·० | १६·१ | २·० | ७·५ | ०·७ | ८ |
| ६५·० | ३४·७ | ४४·३ | १२·६ | १९·८ | ४·७ | ३१ |
| ६४·० | १६·३ | २४·१ | ४·१ | १०·३ | १·१ | १६ |
| ६८·८ | १९·५ | २७·१ | ५·१ | १३·२ | १·८ | ३४ |
| ८३·७ | ४५·९ | ३१·३ | ११·९ | १५·१ | ४·३ | ४० |
| ८२·५ | ४१·४ | ३३·२ | ११·३ | १६·६ | ४·१ | २५ |

९. शिक्षण महामंडळ अहवाल, तक्ता क्र. ६.६ (पृ. १२६).

टक्के). दुय्यम शिक्षणाच्या क्षेत्रात मुलांच्या भरतीत आसाम आघाडीवर आहे (२५·५ टक्के) तर मुलींच्या भरतीत केरळ पुन्हा आघाडीवर आहे (१२·६ टक्के). या दोन्ही बाबतीत ओरिसा पुन्हा शेवटच्या क्रमांकावर आहे ( मुलांचे प्रमाण : ७·५ टक्के, मुलींचे प्रमाण : ०·७ टक्के). उच्च शिक्षणात पश्चिम बंगाल प्रथम-क्रमांकाला आहे (दर दहा हजारात ४०) तर ओरिसाने येथेही आपला शेवटचा क्रमांक कायम टिकवला आहे (दर दहा हजाराला आठ).

विविध राज्यांतील, विविध प्रदेशांतील विषमतेचे हे प्रमाण उत्तरोत्तर नाहीसे करण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. केवळ बाह्य मदतीने हे काम होण्यासारखे नाही. त्यासाठी त्या त्या राज्याने, प्रदेशानेही जागृत होऊन काही हालचाल करणे आवश्यक आहे. बाह्य मदत व अंतर्गत प्रयत्न यांचा योग्य मेळ बसत गेला तर ही विषमता कमी कमी करता येईल. या विषमतेचा संपूर्ण निरास होणे शक्य नाही हे शिक्षण महामंडळाने केलेले विधान व्यावहारिक दृष्टिकोनातून युक्त असेच आहे. परंतु तसा संपूर्ण निरास होणे इष्टही नाही असे शिक्षण महामंडळाने विधान करावयाचे खरोखर कारण नव्हते. वाक्याच्या ओघात त्या ठिकाणी तो शब्द आला व वाक्याचा तोल साधण्याच्या मोहात ते विधान होऊन गेले असावे अशीही एक ओझरती शंका आल्यावाचून राहत नाही.[१०]

---

१०. 'A total elimination of these differences in educational development is neither possible nor desirable' ( अहवाल पृ. १३५). या पुढची दोन वाक्ये 'desirable'चे थोडे समर्थन करणारी वाटतात. ' In the larger interests of the country each region should be free to strive its best and to develop its own pace. This will necessarily lead to some inequalities of development.' परंतु ही विधाने फारच मोघम व असमाधानकारक वाटण्याइतकी अपुरी आहेत.

सात

# संधीच्या समानतेचे तंत्र

शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने आज अनेक राष्ट्रांत विचार चालू आहे. प्रगत भांडवलशाही राष्ट्रांतून हा विचार चालू आहे, त्याचप्रमाणे साम्यवादी राष्ट्रांतूनही अर्थातच हा विचार चालू आहे. या दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांतून या दिशेने जागरूक वाटचालही चालू आहे. परंतु संधीची अशी समानता पूर्णपणे प्रस्थापित करण्यात अजून कोणत्याही राष्ट्राला यश आलेले नाही. शिक्षणाची समान संधी निर्माण करण्याच्या दिशेने साम्यवादी राष्ट्रांचा विशेष आग्रह असणे स्वाभाविक आहे. परंतु जवळजवळ पन्नास वर्षांच्या साम्यवादी समाजरचनेच्या दिशेने केलेल्या वाटचालीनंतर अद्यापही रशियात ही संधीची समानता पूर्णपणे अस्तित्वात आलेली नाही.

दीर्घ कालावधीच्या साम्यवादी प्रयोगानंतरही रशियाला आपल्या शिक्षण व्यवस्थेत समान संधीच्या दृष्टीने विचार करता दोन दोष आढळून आले. एक दोष असा की अधिकारी वर्ग व बुद्धिजीवी वर्ग यांच्या मनात आपल्या मुलांना शारीरिक श्रमाची कामे करावयास लागणे फार कमीपणाचे वाटते असे आढळून आले. आपले वजन खर्ची घालून वा लाचलुचपतही करून आपापल्या मुलांना ते उच्च शाळांतून वा विद्यापीठातून प्रवेश मिळवून देण्याचा प्रयत्न करीत. कारण त्यानंतर श्रमाचे व्यवसाय टाळून पांढरपेशा वर्गात सामील होणे शक्य होई. याशिवाय दुसरे असेही आढळून आले की शेतकरी किंवा कामकरी वर्गांतील फारच थोडी मुले दुय्यम शिक्षण घेतल्यानंतर उच्च शिक्षण घेऊ शकत असत. साम्यवादी युवक संघटनेच्या १३ व्या सभेपुढे भाषण करताना १९५८ मध्ये क्रूश्चेव्हने ह्या ‘ लाजिरवाण्या परिस्थिती ’चा निषेध केला आणि ही घटना समाजवादी जनताभिमुख समतेच्या तत्त्वाच्या विरोधी असल्याचा आरोप केला. यात सुधारणा करण्यासाठी डिसेंबर १९५८ मध्ये एक कायदा पास करण्यात आला. या कायद्यान्वये उच्च शाळांतून गुणवत्तेच्या कसोटीवर प्रवेश देण्यात यावयाचा आहे. तसेच विद्यार्थ्यांची निवड करताना कामगारसंघटना व साम्यवादी युवक संघटना यांचे प्रतिनिधी त्या निवड समितीवर असावयाचे आहेत. आपल्याकडे ज्याला आपण आर्टस् व सायन्स अभ्यासक्रम म्हणतो त्या अभ्यासक्रमा-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नोंद दि: ........................


खरीज इतरत्र प्रवेश देताना ज्यांना प्रत्यक्ष कामाचा निदान दोन वर्षांचा अनुभव आहे त्यांनाच प्रवेश देण्यात यावयाचा आहे. यातही आधी नोकरीस असलेल्या व तेथील व्यवस्थापकांकडून पुरस्कृत होऊन आलेल्या उमेदवारांना अग्रक्रम मिळावयाचा आहे.

या कायद्याचे प्रत्यक्ष फलित काय झाले ह्याची निश्चित माहिती उपलब्ध नाही. परंतु संपूर्ण समान संधींच्या ध्येयाच्या दिशेने रशियालाही अजून बरीच वाटचाल करावयाची आहे एवढे यावरून स्पष्ट व्हावयास हरकत नाही.

समृद्ध भांडवलशाही राष्ट्रातही समान संधीच्या ध्येयाकडे वाटचाल करताना विविध अडचणी आढळून येतात. ‘ समान संधीचा आधार ’ म्हणजे नेमके काय व ‘ समान संधीचे संपूर्ण अस्तित्व ’ कशास म्हणावे याच्याही निश्चित अशा व्याख्या आजपर्यंत कोणी करू शकलेले नाही. कदाचित् काही गोष्टी ढोबळपणे धरल्याखेरीज अशा व्याख्या करता येणार नाहीत.

समान संधीच्या काटेकोर मापनात अनेकविध मोठ्या अडचणी आहेत हे लक्षात घेऊनही संधीच्या विषमतेतील अंतर कमी करण्याचे व्यावहारिक उपयुक्त प्रयत्न करता येतात. या प्रयत्नांचे स्वरूपही समृद्ध भांडवलशाही राष्ट्रांत व साम्यवादी राष्ट्रांत वेगळे असते. अमेरिकेसारख्या राष्ट्राचा भर अनुदाने, शिष्यवृत्या, कर्जाऊ रकमा, यांसारख्या आर्थिक मदतीच्या प्रवाहावर अधिक असतो. समृद्ध राष्ट्रात हे प्रवाहदेखील इतके जोमदार असू शकतात की त्यांचा काही इष्ट परिणाम दिसल्याखेरीज राहत नाही. साम्यवादी राष्ट्रांत आर्थिक मदतीचा उपयोग केला जात असला तरी मुख्य भर समान संधीच्या दृष्टीने उपयोगी अशी शिक्षणसंस्थांची व प्रवेशपद्धतीची रचना करण्यावर असतो. रशियात आज अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेतील या दृष्टीची काही वैशिष्टचे खालीलप्रमाणे सांगता येतील.[११]

(१) प्रत्येक स्तरावर गुणवत्तेप्रमाणे प्रवेश देण्याचा प्रयत्न केला जातो.

(२) पालकांचे उत्पन्न कमी असल्यास मुलाच्या शिक्षणावर त्याचा प्रतिकूल होऊ नये यासाठी वसतिगृहात्मक विद्यालये ( Boarding Schools ) अस्तित्वात आणली आहेत. अशा विद्यालयांत सरासरी ८०० विद्यार्थी असतात व आज अशी

---

११. Dr. C. D. Deshpande : Some Basic Aspects of the Educational Systems of the U.S.S. R. and the U.K. and the extent of the applicability of their conditions in Maharashtra, 1966 ( Mimeographed ) वरून

सुमारे सहाशे विद्यालये अस्तित्वात आहेत. हळूहळू दुय्यम शिक्षणाच्या शाळांपैकी साठ टक्के शाळा वसतिगृहात्मक पद्धतीच्या शाळा कराव्यात असे आज रशियाचे धोरण दिसते. या शाळांतून विद्यार्थ्यांना गुणवत्तेप्रमाणे प्रवेश मिळतो. परंतु गरीब कुटंबातील मुलांना प्रवेशात अग्रक्रम मिळतो. गरजू विद्यार्थ्यांचे जेवण, खाणे, कपडालत्ता, निवास, पुस्तके, इत्यादी सर्व खर्च सरकार करते. इतर विद्यार्थ्यांच्याकडून त्यांच्या पालकांच्या उत्पन्नाच्या प्रमाणात आकार घेण्यात येतो. विद्यार्थ्यांना साधेपणा व स्वावलंबन यांचे शिक्षण दिले जाते.

(३) दिवसभराच्या शाळाहि रशियात अस्तित्वात आहेत. या शाळेतून विद्यार्थी सकाळी लवकर हजर झाला की तो सकाळी शाळेत शिकतो, दुपारचे जेवण शाळेत घेतो, नंतर दुपारी पुन्हा अध्ययन करून, खेळ आटोपून संध्याकाळी घरी जातो.

(४) बुद्धिमान विद्यार्थ्यांच्यासाठी विशेष शाळा चालविण्यात येतात. गुणवत्तेच्या क्रमाने प्रवेश दिला जातो. मुले व मुली दोघांनाही प्रवेश मिळू शकतो. दोन विद्यार्थी समान गुणवत्तेचे असले तर ग्रामीण विभागातील किंवा कामकरी वर्गातील विद्यार्थ्याला प्रथम संधी देण्यात येते.

(५) विद्यापीठाच्या स्तरावर गुणवत्तेप्रमाणे प्रवेशाचे व संधीचे चित्र तसेच पुढे चालू राहते. दुय्यम शिक्षणानंतर जे विविध व्यवसायात शिरतात त्यांनाही संध्याकाळचे वर्ग, टपालाने शिक्षण (कॉरेस्पाँडन्स कोर्सेस) या पद्धतीने उच्च शिक्षणाचा लाभ घेता येईल अशी तरतूद केलेली आहे.

परंतु असे असले तरी सामाजिक व कौटुंबिक परिस्थितीतील फरकामुळे पडणारा संधीतील फरक रशियालाही पूर्णपणे दूर करता आलेला आहे असे नाही. मुलाचे मुख्य शिक्षण हे त्याच्या वयाच्या पांचव्या वर्षापर्यंतच होत असते या बर्ट्रांड रसेल यांच्या म्हणण्यात खरोखरच काही विशेष अर्थ आहे. यादृष्टीने पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रातील आजच्या रशियातील समान संधीच्या उणीवा ह्या अंतिम समान संधीच्या दृष्टीने मारक आहेत असेच म्हणावे लागेल. या पातळीवरचे शिक्षण सक्तीचे नाही वा मोफतही नाही. या वयोगटांतील बालकांच्या पैकी वीस टक्केच बालके पूर्वप्राथमिक शाळांतून असतात. इतरांच्यावर त्यांच्या कौटुंबिक व सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीचा जो काही परिणाम होत असेल तेवढेच काय ते त्यांचे शिक्षण. या शिक्षणाची पातळी यामुळे फारच विभिन्न राहिल्यास आश्चर्य वाटावयास नको.

कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभूमीमुळे निर्माण होणारी विषमता दूर करण्याचे निश्चित असे तंत्र अद्याप उपलब्ध झालेले नाही. शिक्षण हे विसाव्या शतकापर्यंत सर्वच देशांतून काही वर्गांची मिरासदारी होऊन राहिलेले होते. स्त्रीवर्ग त्यापासून वंचित होता. कनिष्ठ वर्ग त्यापासून वंचित होते. सामाजिक पार्श्वभूमीमुळे शिक्षणात फरक पडे, शिक्षणातील फरकामुळे धनार्जनाच्या कुवतीत फरक पडे व सामाजिक श्रेष्ठतेबरोबर आर्थिक वर्चस्वहि वरिष्ठ वर्गाच्या हाती येई. सामाजिक दृष्टचा प्रगत व आर्थिक दृष्टचा सधन असणाऱ्या या वर्गातील कुटुंबातून येणारी मुले साहजिकच शैक्षणिक संधीच्या दृष्टीने कितीतरी अधिक अनुकूल वातावरणात असतात. पाटचा, पुस्तके, चित्रे, खेळणी यांच्या बाबतीत तर परिस्थिती अनुकूल असतेच, परंतु सर्वांत महत्त्वाची अनुकूलता कुटुंबातील मुरलेल्या शैक्षणिक संस्कारांची असते. या अनुकूलतेची उणीव इतर विद्यार्थ्यांना भरून काढणे अतीव दुष्कर असते. ही मुले शिक्षणाच्या वरच्या स्तरावर कमी प्रमाणात जातात. रशियातदेखील, आजवरच्या प्रयत्नानंतरही, कामकरी कुटुंबातील मुले उच्च शिक्षणाकडे कमी प्रमाणात वळतात असे आढळून आले आहे.

या विषयीचे काही अभ्यास झाले आहेत व त्यांचे निष्कर्ष वरील विधानाल पोषक असेच आहेत. परंतु जितक्या मोठचा प्रमाणावर व जितक्या तपशीलाने हे अभ्यास व्हावयास हवे आहेत तितक्या पद्धतीने हे कार्य झालेले नाही. कनिष्ठ वर्गातील बुद्धिमान् मुलांच्या शिक्षणाच्या संबंधात ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते. या बुद्धिमान् मुलांना शिक्षण न मिळण्यात एक सामाजिक अन्याय तर आहेच परंतु समाजाचे मोठे नुकसानही आहे. कारण त्यामुळे समाजातील संपूर्ण बुद्धिसामर्थ्याचा नीट विकास होऊन ते समाजाच्या कारणी लागू शकत नाहीं.

प्रतिकूल कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीचा परिणाम दूर करावयाचा तर लहानपणापासून चांगल्या वसतिगृहात्मक शाळेत मुलाला घालावे लागेल. तेथील सर्व खर्चाची तरतूद सरकारने करावी लागेल. इतकेच नव्हे तर, कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी मुलाला लवकर शिक्षण सोडण्याची पाळी आली तर, त्याला नोकरी करून मिळू शकले असते तितके वेतन त्याला शिष्यवृत्ती म्हणून देण्याची तरतूद झाली पाहिजे.

या सर्व गोष्टी साध्य करणे किती अवघड आहे हे सहज लक्षात येऊ शकेल. भारतासारख्या दरिद्री देशात तर ते दुर्घट आहेच. पण इतर समृद्ध देशांतही या

सामाजिक प्रतिकूलतेचा परिगाम पूर्णपणे दूर करणे शक्य होणार नाही असेच सर्वसाधारण मत आहे. या संदर्भात युनेस्कोच्या प्रकाशनात[१२] काढलेले उद्गार उद्धृत केले की पुरेसे आहे.

'जोपर्यंत कुटुंब हा समाजाचा जिवंत घटक आहे तोपर्यंत कौटुंबिक वातावरणापासून मुलांना पूर्णपणे अलग काढणे व त्या वातावरणाचा त्यांच्यावर परिणाम होऊ न देणे शक्य होणार नाही. दोन मुलांची बुद्धिमत्ता सारखी असली तरी, डॉक्टरचा, शिक्षणाधिकाऱ्याचा मुलगा हा शेतकऱ्याच्या किंवा कामकऱ्याच्या मुलापेक्षा अधिक उच्च शिक्षण घेऊ शकतो व त्यामुळे नंतर समाजात अधिक प्रतिष्ठेचे स्थान मिळवू शकतो हा सर्व देशांचा अनुभव आहे. परंतु या गोष्टीकडे समाजाचे तसे नीट लक्ष जात नाही. हे का होते याचा जर सूक्ष्म विचार झाला तरच याच्यावर उपाय सापडण्याची शक्यता आहे. आज सर्व जगात शिक्षण हे समाजाभिमुख झाले पाहिजे, सार्वत्रिक झाले पाहिजे, त्याचा प्रसार झाला पाहिजे अशा प्रेरणा आढळून येतात. परंतु या गोष्टींची कार्यवाही कशी करावयाची याचा नीट विचार जर झाला नाही तर या प्रेरणा वांझ, निष्फळ ठरल्याखेरीज राहणार नाहीत.'

१२. Unesco : Economic and social aspects of educational planning (p. 105).

आठ

# शिक्षणाच्या विविध स्तरांवरील विषमता व तिचे निराकरण

भारतात शिक्षणाच्या समान संधीच्या दृष्टीने असणारी काही प्रादेशिक विषमता आपण पूर्वी पाहिली आहे. शिक्षणाच्या विविध स्तरांवर या विषमतेचा प्रभाव किती प्रमाणात दिसून येतो ते आता पाहू.

पूर्वप्राथमिक शिक्षणाची तरतूद आपल्या देशात फारच अल्पसंख्य मुलांच्या बाबतीत शक्य झालेली आहे. या वयातील मुलांसाठी आज अस्तित्वात असणाऱ्या शाळा ह्या मुख्यत्वेकरून शहरात असतात व तेथेही उच्च मध्यम वर्गातील किंवा श्रीमंत वर्गातील मुलेच या शाळांचा लाभ घेतात असे आढळून येते. या शाळांना सामान्यपणे सरकारी अनुदान नसते. असलेच तर अत्यल्प असते. साहजिकच या शाळांतील फी फार असते. गरीब लोकांना आपल्या मुलांना त्या शाळांतून पाठण्याचा विचार करणे देखील अशक्य असते. सर्व मुलांना या शाळा उपलब्ध होतील असे करावयाचे झाल्यास त्या प्रमाणात अनुदाने उपलब्ध करावी लागतील (किंबहुना, प्राथमिक शिक्षणाप्रमाणे पूर्वप्राथमिकही **पूर्णपणे** सक्तीचे व मोफत करावे लागेल.) परंतु राष्ट्राच्या आजच्या आर्थिक अवस्थेत हे शक्य होणार नाही. (रशियात देखील आज हे केवळ तीस टक्के मुलांच्या बाबतीत साध्य झालेले आहे हे आपण पाहिले आहेच.)

आजच्या आपल्या व्यवस्थेत असमान संधीचा पाया ज्याप्रमाणे कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीतच घातला जातो त्याप्रमाणे त्या पायाच्या वरील इमारतीतील विषमतेलाही पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या स्तरापासूनच सुरुवात होते. या प्रारंभिक अनुकूलतेचे परिणाम दूरगामी व शेवटपर्यंत टिकणारे असे राहतात.

भारतात प्राथमिक शिक्षण हे अर्थातच सार्वत्रिक सक्तीचे व मोफत आहे. येथेही श्रीमंत वर्गाची मुले फी घेणाऱ्या शाळांत जाऊन विशेष चांगले शिक्षण घेऊ शकतात हे या प्रश्नाचे एक अंग होय. या शाळा बंद करणे व सर्वांना सरकारी मोफत शाळांतूनच आपली मुले पाठविण्यास भाग पाडणे ही गोष्ट आपण केली पाहिजे असाही

काहींचा आग्रह असतो. यामुळे या शाळांच्या सुधारणेकडे वरिष्ठ वर्गाचे लक्ष जाईल व वरिष्ठ वर्गातील मुलेही इतर वर्गातील मुलांत मिसळल्यामुळे त्या मुलांच्या मनातील वरिष्ठ वर्गीय भावनाही कमी व्हावयास मदत होईल अशी कल्पना या आग्रहामागे असते. ही सूचना अर्थातच आजच्या परिस्थितीत व्यवहार्य म्हणून स्वीकारली जाण्याची शक्यता नाही.

या वरिष्ठ वर्गीय प्राथमिक शाळा सोडल्या तर उरलेल्या विभागात नव्व्याण्णव टक्क्यांहून अधिक मुले शिक्षण घेत असतात. या मुलांच्या शिक्षणाच्या प्रश्नाचा दोन अंगांनी विचार करावा लागतो. (१) वयाच्या सहाव्या वर्षी प्रत्येक मुलगा किंवा मुलगी शाळेत भरती होईल आणि वयाची चौदा वर्षे पूर्ण होईपर्यंत ती मध्येच शाळा सोडून बाहेर पडणार नाहीत याची दक्षता घेणे; व (२) प्राथमिक शिक्षणाचा कस वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

आज दोन्ही दृष्टींनी पुष्कळच कार्य करावयाचे राहिले आहे. आजही सर्व मुले व मुली प्रवेश घेतातच असे नाही.[13] तो प्रवेश सक्तीचा केला तरी प्रवेश केलेल्यांपैकी पुष्कळच अर्धवट शिक्षण सोडून मध्येच बाहेर पडतात. त्यांच्यावरचे साक्षरतेचे संस्कार हे फारच पुसट असतात. आज जे शिक्षण उपलब्ध आहे त्याचा लाभही सर्वांना सारखा मिळतो असे नाही. त्यात राज्यनिहाय, जिल्हानिहाय, तालुकानिहाय फरक आहेत. नागरी व ग्रामीण विभागात फरक आहे. मुले व मुली, प्रगत जाती व अप्रगत जाती यांना मिळणाऱ्या शिक्षणाच्या संधीत फरक आहे. हा फरक संख्येच्या टक्केवारीत असेल, त्याप्रमाणे शिक्षणाच्या कसातही असू शकेल. सर्व राज्यांतून प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात तरी समानता निर्माण करण्याचे प्रयत्न पुढील दोन-तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात होणे आवश्यक आहे.

दुय्यम व उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात या समान संधीच्या प्रयत्नाचे स्वरूप अधिक मर्यादित व स्पष्ट करता येते. आर्थिक व सामाजिक दृष्ट्या अडचणीत असलेल्या वर्गातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची योग्य निवड कशी होईल व त्याना समान संधी कशी

१३. महाराष्ट्रात एका प्रगत समजल्या जाणाऱ्या जिल्ह्यात ग्रामगौरव झालेल्या एका सुमारे पाच हजार वस्तीच्या गावात तेथील दुय्यम शाळेने या वस्तुस्थितीची पाहणी घरोघर जाऊन काही दिवसांपूर्वी केली. ६ ते ८ या वयोगटातील मुलांपैकी २५० मुले शाळेत भरती झालेली नाहीत असे आढळून आले.

मिळेल हे या प्रश्नाचे या पातळीवर मुख्यत्वेकरून स्वरूप राहते.[१४] वर्गवार या संधींची विभागणी कशी होते याचाही आपण काहीसा ढोबळ विचार केला असला तरी त्याचा जितका तपशीलवार अभ्यास व्हावयास पाहिजे तितका अद्याप भारतात करण्यात आलेला नाही. परंतु जे काही थोडे अभ्यास करण्यात आलेले आहेत त्यांवरून दुय्यम व उच्च शिक्षणातील संधीचा प्रमुख वाटा समाजातील नागरी उच्च मध्यम वर्ग, श्रीमंत वर्ग, अधिकारी वर्ग, उच्च पेशातील वर्ग अशा सुमारे लोकसंख्येतील वरच्या दहा टक्क्यांच्या गटालाच मिळत असला पाहिजे असा अंदाज आहे.

ही विषमता कशी दूर करावी हा आपल्यापुढील खरा बिकट प्रश्न आहे. यातील बिकटपणा अनेक कारणांमुळे निर्माण झालेला आहे. एकतर विशिष्ट शिक्षित लोकांची भिन्न भिन्न आर्थिक क्षेत्रात किती गरज लागेल याचे अनेक अंदाज बांधण्याइतके आपले नियोजन अद्याप प्रगत झालेले नाही. त्यामुळे अमुक दिशेने गेले असता अमुक फळ निश्चितपणे हाती पडेल असे आश्वासन कोणाच्याच मनात राहत नाही. साहजिकच बाह्यत: जी क्षेत्रे फलदायी व आकर्षक वाटतात त्यांच्याकडे सर्वांची धाव राहते. साधनांच्या मर्यादेमुळे त्या क्षेत्रांत असणारी संधी हीही मर्यादितच असते व अनेकांना प्रवेशाअभावी वैफल्याची भावना येते. निवडक प्रवेशाच्या तत्त्वाला होणाऱ्या विरोधामागे या अनिश्चिततेचाही मोठा भाग आहे. प्रत्येक स्तरावर किती लोकांना निश्चित काम मिळण्याची शक्यता आहे याची कल्पना जर आपण सत्यार्थाने करू शकलो व प्रत्येक पातळीवर विद्यार्थ्याला तसे मार्गदर्शन करू शकलो तरच हा प्रश्न वैफल्याची भावना निर्माण होऊ न देता सोडविता येईल.

अर्थात त्या मर्यादेतही निवडक प्रवेशाचे तत्त्व विद्यार्थ्यांची कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेच वापरावे लागेल. सरसकट गुणानुक्रमे प्रवेश देऊन चालणार नाही. वसतिगृहात्मक शाळा, दिवसभराच्या शाळा ( Long Day Schools ), शिष्यवृत्त्या, या मार्गांनी पहिल्यापासूनच या वर्गातील मुलांना विकासाची दिशा देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. वर्गीकृत जाती-

१४. कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभूमीच्या प्रतिकूलतेमुळे होणारे आघात हे प्राथमिक शिक्षणाच्या टप्प्यात जबरदस्तपणे होतात, मुलाचे वय जसजसे वाढत जाते तसतसा कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीच्या प्रतिकूलतेचा आघात त्याला कमी कमी जाणवू लागतो, असा एक मतप्रवाह आहे. परंतु त्याला पुरेशा पाहणीचा आधार अद्याप मिळालेला नाही असे युनेस्कोच्या Economic & Social Aspects of Educational Planning ह्या प्रकाशनात नमूद करण्यात आले आहे ( पृ. १०४ ).

जमातींच्या शिक्षणाविषयीचा जो दृष्टिकोन चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या आराखडयात मांडण्यात आलेला आहे त्यावरून या प्रश्नाची जाणीव आज नियोजनकारांना व शिक्षणतज्ज्ञांना बऱ्याचशा प्रमाणात झालेली आहे हे दिसून येते. परंतु शेवटी पुरेसे पैसे व पुरेसे कार्यकर्ते उपलब्ध होण्याच्या प्रश्नाशीच हा प्रश्न येऊन अडतो. व त्या बाबतीतील आग्रह हा, एकूण राष्ट्रालाच समाजवादी समाजरचनेच्या दृष्टीने शिक्षणातील समान संधीविषयी किती अगत्य आहे यावर अवलंबून राहतो.

हे असले तरी या विषयीच्या चौथ्या पंचवार्षिक योजनेतील कल्पना समजून घेणे उपयोगी होईल. वर्गीकृत जमातींविषयी योजनेचा दृष्टिकोन तेथील शैक्षणिक प्रयत्नाची सांगड तेथील आर्थिक विकासाच्या प्रयत्नाशी घातली पाहिजे असा आहे. हे कसे करावयाचे याचा तपशील मात्र देण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे वर्गीकृत जमाती एकत्र समूहाने राहण्यापेक्षा विखुरलेल्या छोटया छोटया वाडयातून राहत असतात आणि यामुळे घराच्या जवळ विद्यालय असणे त्या विभागात कठीण असते. यासाठी शक्य तितक्या प्राथमिक शाळा वस्तीच्या जवळ असाव्यात परंतु माध्यमिक व दुय्यम शिक्षणाच्या शाळा मात्र एखाद्या मध्यवर्ती वस्तीच्या ठिकाणी पुरेशा वसतिगृहाच्या सोयींसह स्थापन करण्यात याव्यात असे सुचविले आहे. तसेच या विभागात काम करणाऱ्या अध्यापकांचे शिक्षण, वसतिगृहांची सोय, शास्त्र व गणित यांच्या अध्ययनाची तरतूद, व व्यावसायिक तांत्रिक शिक्षणक्रमाची सोय यावर विशेष भर देण्यात यावा, असे सुचवले आहे.

वर्गीकृत जातींच्या संदर्भातही चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या आराखडयात केलेल्या सूचनांत आजवरच्या कामाचा आढावा आहे व पुढील कार्याच्या दिशेची सूचना आहे. या वर्गातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत आहे. विद्यार्थ्यांना एस.एस.सी. पर्यंत शिक्षणासाठी राज्यसरकारे आर्थिक मदत देत आहेत. याखेरीज एस.एस.सी. नंतरच्या उच्च शिक्षणासाठी केंद्र सरकार आर्थिक साहाय्य देत आहे. सध्याच्या यंत्रणेत सुधारणा करावयास वाव आहे व ती केली पाहिजे हे योजनेने मान्य केले आहे. त्या खेरीज केवळ सध्याच्या स्वरूपाच्या आर्थिक साहाय्याच्या कार्यक्रमावरच विसंबून न राहता या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत विकासाकडे लक्ष दिले जाण्याची, त्यांच्यासाठी विशेष अध्यापनाची व्यवस्था करण्याची आवश्यकता असते व असे केल्यासच या विद्यार्थ्यांचा विकास नीट होऊ शकेल याचा निर्देश योजनेने केला आहे.

अधिकाधिक आर्थिक साहाय्य अधिकाधिक विद्यार्थ्यांच्या संख्येपर्यंत प्रभावी उपयोगी पद्धतीने पोचावणे हाच वर्गीकृत जाती व जमाती यांच्यापर्यंत शिक्षणाची संधी समान प्रमाणात पोचविण्याचा महत्त्वाचा मार्ग आहे. आर्थिक साहाय्य कितपत उपलब्ध होऊ शकते हे राष्ट्राच्या एकूण आर्थिक परिस्थितीवर व त्याचप्रमाणे राष्ट्राला या गोष्टीची निकड किती वाटते याच्यावर ते अवलंबून राहील. दुर्दैवाने आजही अशी तीव्र पोटतिडीक या प्रश्नाबाबत राष्ट्राच्या धोरणात निर्माण झालेली आहे असे दिसत नाही.

हा केवळ सरकारी धोरणाचा किंवा यंत्रणेच्या कार्यक्षमतेचा प्रश्न नसून एकूण समाजाच्या सर्वसाधारण वृत्तीचाही प्रश्न आहे हेही आपण ओळखले पाहिजे. सरकारी साहाय्याचा व यंत्रणेचा प्रभावी उपयोग व्हावयाचा असेल तर विद्यार्थ्यांकडे आपुलकीने व्यक्तिगत लक्ष देण्याचे काम सरकारी कर्मचाऱ्यांवर सोपवून चालणार नाही. ते काम मिशनरी वृत्तीच्या कार्यकर्त्यांनी व संस्थांनीच अंगावर घेतले पाहिजे. भारतातील मागास प्रदेशात, जातिजमातीत सेवावृत्तीने येऊन राहणारे परदेशातून आलेले लोक आढळतात. परंतु आपल्या लोकांनी, उच्चवर्णीयांनी व उच्चवर्गीयांनी (आणि यात या वर्गीकृत जातिजमातींच्या बाहेरील सर्व जातींचे, वर्गांचे लोक आले,) केलेले काम सूक्ष्मदर्शक यंत्राखालीच शोधावे लागते ही वस्तुस्थिती ही भारतीय समाजमनाचीच निदर्शक नाही काय ?

नऊ

# निवडक प्रवेशाचे धोरण

अप्रगत देशांत किंवा अर्धप्रगत देशांत शिक्षणाच्या क्षेत्रात संख्या व गुणवत्ता यांच्यामधील संघर्ष वेगवेगळ्या रूपात पुढे येतो. काही देशांत, सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणावर भर द्यावा की काही थोड्या लोकांना चांगले दुय्यम व उच्च शिक्षण द्यावे असा प्रश्न निर्माण होतो. वाईट शिक्षकांच्या करवी अनेकांना शिक्षण देत बसावे का चांगल्या शिक्षकांकरवी काही थोड्याच लोकांना परंतु चांगले शिक्षण द्यावे असा प्रश्न होऊ शकतो. पदवीसाठी सकस अभ्यासक्रम ठेवावा की अनेकांना पदवी घेणे सुलभ व्हावे म्हणून तो अभ्यासक्रम पातळ करावा ही गोष्ट विचारात घ्यावी लागते. सर्वसाधारणपणे सर्वत्र असे आढळून येते की राजकीय व सामाजिक दबाव संख्यावाढीच्या दिशेने येत असतात तर आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारी तंत्रज्ञांची गरज गुणवत्तेचा, शिक्षणाच्या कसाचा आग्रह धरणे कसे अटळ आहे हे ध्यानात आणून देत असते.

गोदिनो या पाश्चिमात्त्य अभ्यासकांनी भारतात त्यांनी केलेल्या निरीक्षणाच्या आधारे काही निष्कर्ष काढले आहेत. भारतांतील विद्यापीठे हा अभ्यासाचा विषय म्हणून त्यांनी घेतला होता. निवडक प्रवेशाच्या धोरणाचा मुख्य संबंध उच्च शिक्षणाच्या स्तराशीच येत असल्यामुळे या प्रश्नाच्याविषयी गोदिनो यांनी केलेले विवेचन विषयाच्या जवळ जवळ सर्व बाजू विचारात घेणारे झाले आहे. अल्प काळात या प्रश्नाचे मूलगामी स्वरूप त्यांनी इतक्या पूर्णपणे आत्मसात करावे याचे कौतुक वाटल्याखेरीज राहात नाही. एका त्रयस्थ निरीक्षकाचे निरीक्षण या दृष्टीनेही त्याचे महत्त्व आहे. ते लिहितात : [१५]

“ भारतातील उच्च शिक्षणविषयक प्रयत्नांत दोन विचार प्रवाह आढळून येतात. विद्यार्थ्यांना अधिक संख्येने प्रवेश द्यावा, त्याचा प्रसार करावा व ते समाजापर्यंत नेऊन पोचवावे असा एक विचार प्रवाह आहे. दुसरा प्रवाह अधिक व्यावसायिक शिक्षण द्यावे, शिक्षणाचा कस वाढवावा आणि काही विशेष क्षेत्रातील विकास व

१५. Robert L. Gaudino : The Indian University, Popular Prakashan, Bombay, 1965, पृ. २७–२८.

संशोधन यांच्याकडे अधिक लक्ष द्यावे असा आहे.

" आजवर ज्यांना शिक्षणाची संधी मिळाली नाही त्यांना शिक्षण मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे ही सर्वांत मोठी मागणी आहे. तिच्यामागे राजकीय सामर्थ्यही आहे. पालक, स्थानिक पुढारी, राज्यस्तरावरील शासकीय अधिकारी, खासगी संस्था, काही शिक्षक वर्ग यांना शिक्षणाचा झपाट्याने प्रसार व्हावयास हवा आहे. प्राथमिक शिक्षणाच्या पातळीवर तर हवाच आहे, परंतु उच्च शिक्षणाच्या पातळीवरही हवा आहे.

" या प्रसाराची दोन अंगे असू शकतात. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या गुणवत्तेप्रमाणे शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हे एक अंग होय. त्याचप्रमाणे आजपर्यंत या संधीपासून जे वर्ग वंचित राहिले त्या वर्गांना, जातिजमातींना त्यांच्यासाठी प्रवेशात वाटा ठरवून काही किमान संधी निश्चितपणे उपलब्ध करून देणे हे दुसरे अंग होय. या दुसऱ्या विचारसरणीप्रमाणे सर्व नागरिक सारख्याच सुस्थितीत नसताना यासाठी परिस्थितीच्या प्रतिकूलतेचा परिणाम नाहीसा करण्यासाठी अशा वर्गांन विशेष सवलती देणे आवश्यक आहे. सरकारने कायद्याने ठरवून दिलेला प्रवेशातील ' कोटा ' हे या सवलतीचे एक स्वरूप राहू शकेल. अशा रचनेत नव्याने राजकीय सामर्थ्य प्राप्त झालेल्या जातीजमातींना काही अधिक सवलती मिळू शकतात.

" महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांच्या दृष्टीने विद्यापीठाची पदवी ही कारकुनाची नोकरी मिळवावयास असणारी संधी या दृष्टीने तिचे महत्त्व असते. केवळ एस्.एस्.सी. झालेल्या विद्यार्थ्याला इतक्या सुलभपणे ही नोकरी मिळत नाही म्हणूनच पदवीची किंमत. विद्यार्थ्याला वाटत असते तितक्या सुलभपणे ही नोकरी मिळू शकतेच असे नाही, परंतु तसे झाले तरी पदवी नसलेल्या उमेदवारापेक्षा पदवीधराला ती संधी मिळण्याची शक्यता साहजिकच अधिक असते. याखेरीज एस्. एस्. सी. झाल्यानंतर महाविद्यालयात जाण्याखेरीज दुसरे काही करून हा विद्यार्थी आपला वेळ सत्कारणी लावू शकेल अशी शक्यताही फारच कमी असते.

" आज महाविद्यालये अनेक आडवळणाच्या जिल्ह्यांतून व गावांतून निघत आहेत. अर्थातच तेथील शिक्षणाचा दर्जा खालच्या प्रतीचा आहे. परंतु लोकांची आजची निकडीची भूक दर्जाची नाही. आपल्या मुलांना पदव्या मिळाव्यात ही त्यांची इच्छा आहे. विद्यार्थ्यांच्या मनातही कमीत कमी अभ्यास करून व इंग्रजीचा कमीत कमी स्पर्श होऊ देऊन पदवीपर्यंत कसे पोचता येईल एवढाच विचार असतो.

दर्जेदार शिक्षणासाठी करावे लागणारे प्रयास त्यांना टाळावयाचे असतात. महाविद्यालयांच्या संख्येतील वाढ व ग्रामीण भागात महाविद्यालयांची स्थापना ह्या स्वातंत्र्योत्तर काळातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील महत्त्वाच्या घटना आहेत.

"शिक्षणाचा प्रसार करून विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ करण्याच्या ह्या प्रेरणेमुळे निर्माण होणाऱ्या परिणामांचा कोणी बारकाईने विचार करीत नाही. या विचारसरणीचे प्रवर्तक कोणत्या प्रकारचे अभ्यासक्रम असावेत, कोणते शिक्षण दिले जावे याचा सहसा विचार करीत नाहीत. त्यांच्या दृष्टीने पदवीचे महत्त्व असते, तिच्या दर्जाचे नसते. या प्रक्रियेकडे केवळ एक दर्जा खालावण्याची प्रक्रिया म्हणून पाहून चालणार नाही; कारण ज्या भागात या संस्था निघाल्या तेथे त्यापूर्वी शिक्षणाची संधीही नव्हती व त्यामुळे दर्जाचा प्रश्नही नव्हता. तेथे काहीच अस्तित्वात नव्हते. हा सर्व प्रयत्नच मुळापासून नवा आहे. आज दिले जाणारे शिक्षण आज शिक्षण घेणाऱ्या लोकांच्या गरजेच्या व कुवतीच्या दृष्टीने पुरेसे आहे. आजची गरज ते भागवते व त्याच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न करीत नाही. यात सुधारणा करण्याची आवश्यकता असली तरी ती सुधारणा प्रत्यक्ष गरज व शक्याशक्यता यांचा विचार करूनच केली पाहिजे. याखेरीज इतर गोष्टींच्या अनुरोधाने विचार करणे निकडीचे नाही व तसा विचार उपयोगी होण्यापेक्षा अनुपकारक होण्याचीच अधिक शक्यता आहे."

शिक्षण महामंडळाने केलेली निवडक प्रवेशाची सूचना व त्या सूचनेच्या विरुद्ध आलेली तीव्र सार्वजनिक प्रतिक्रिया या दोहोंचीही पार्श्वभूमी वर गोदिनो यांनी वर्णन केलेल्या परिस्थितीत आहे. राष्ट्राकडे असलेली साधनसंपत्ती जर काटकसरीने व परिणामकारक रीतीने वापरली जावयास हवी असेल तर निवडक प्रवेशाच्या तत्त्वाचा अंगिकार करण्यावाचून गत्यंतर नाही. यामुळे राष्ट्राच्या भावी काळातील प्रशिक्षित मनुष्यबळाच्या गरजेचा विचार करून साधारण तेवढ्या लोकांच्या शिक्षणाची तरतूद करणे आवश्यक ठरते. त्याहून कमी लोकांना शिक्षण मिळाल्यास मनुष्यबळ अपुरे पडून राष्ट्राची हानी होते. अधिक लोकांना मिळाल्यास बेकारीचा धोका निर्माण होतो. मध्यंतरीचा नेमका सुवर्णमध्य समजणे हीदेखील अवघड गोष्ट असते. कारण अंदाज दहा पंधरा वर्षानंतर निर्माण होणाऱ्या व्यावसायिक गरजांचा घ्यावयाचा असतो. प्रगत राष्ट्रांत असे अंदाज बरेचसे समाधानकारक असे करता येण्याची शक्यता असते. भारतासारख्या देशात असे अंदाज बांधण्याचा प्रयत्न

करणे व त्यांच्या आधारावर आपले धोरण ठरवणे म्हणजे काही लोकांना शिक्षणापासून वंचित करणे होय असा विरोधकांचा आक्षेप आहे. परंतु आज ना उद्या आपल्याला या दिशेनेच वाटचाल करणे आवश्यक आहे एवढे विरोधकांनाही मान्य व्हावयास हरकत असू नये.

सरसकट प्रवेश देण्याच्या धोरणामुळे शिक्षणाचा दर्जा टिकवून धरता येत नाही व त्यामुळेही राष्ट्राची हानी होते. यासाठीही निवडक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे धोरण अंगिकारणे युक्त आहे असाही त्या धोरणाचा पुरस्कार केला जातो. सामाजिक राजकीय दडपणांच्या प्रभावापुढे हा आग्रह टिकून राहण्यासारखा नाही ही गोष्ट उघड आहे.

'मुक्तद्वार' प्रवेश व निवडक प्रवेश या दोन भूमिकांतील संपूर्ण अंतर तुटणे अशक्य आहे. एकूण विकासाबरोबर एकूण संधीचेच प्रमाण जसजसे वाढत जाईल तसतसेच हे अंतर तुटत जाईल. परंतु निवडक प्रवेशाचा आग्रह हा खरोखर शिक्षणाच्या समान संधीच्या विरोधी जाणारा असा आग्रह नाही ही गोष्टही थोड्या विचारान्ती लक्षात यावयास हरकत नाही. त्याविषयीची भूमिका थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडता येईल.

त्या आधी आजचा प्रवेश 'मुक्तद्वार' पद्धतीचा आहे हा समज भ्रामक कसा आहे ते पाहणे इष्ट ठरेल.

(१) निवडक प्रवेशाचे तत्त्व लागलें नाही म्हणजे सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळते असे होत नाही. सध्याच्या समाजरचनेत ती संधी आर्थिक दृष्ट्या व सामाजिक दृष्ट्या वर असणाऱ्या वर्गांनाच मिळते. इतर वर्गातील बहुतेक विद्यार्थी अनेक अडचणींनी गांजून शिक्षणाच्या खालच्या इयत्तांच्या पायऱ्यांवरच गळून बाजूला पडतात. ही सध्याची परिस्थितिजन्य 'निवड' ही सर्वांत अन्यायाची व क्रूर आहे.

(२) 'मुक्तद्वार प्रवेश' याचा अर्थ विद्यार्थ्याला त्याला हव्या असलेल्या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळेलच असा आजही होत नाही. मेडिकल, इंजिनिअरिंग, विज्ञानशाखा अशा सर्व ठिकाणी, शिक्षणाचा कितीही प्रसार झाला तरी, प्रयोगशाळांच्या व साधनांच्या प्रमाणात प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या ही मर्यादितच राहणार. यामुळे 'मुक्तद्वार प्रवेश' याचा अर्थ आर्टस् व कॉमर्स शाखांना प्रवेश एवढाच होतो. या शाखांचे आजचे महत्त्व हे महाविद्यालयीन शिक्षणांत दुय्यम व तिय्यम दर्जाचेच राहिले आहे. त्यामुळे विज्ञानशाखेकडे जाण्याविषयी निराश झालेले विद्यार्थी

या शाखांकडे वळतात. क्वचित एखादा बुद्धिमान् विद्यार्थी विज्ञानशाखेकडे जावयाची शक्यता असता या शाखांकडे वळतो. सामाजिक कारणांमुळे चांगल्या विद्यार्थिनी मात्र अजूनही या शाखांकडे येतात. (आर्टस् शाखेकडे पहिला वर्ग व पहिले क्रमांक अलीकडे बहुधा विद्यार्थिनी पटकवतात हे एक याचे दुसरे गमक मानता येईल.) अशा या अभ्यासक्रमांकडे–की ज्यांविषयी तिकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांनाही उत्साह नाही–मुक्तद्वार प्रवेश देऊन आपण काय साधतो ?[१६]

आजवर उच्च शिक्षणापासून पूर्णपणे वंचित राहिलेले काही वर्ग– मागस जाती-जमाती, ग्रामीण जनता, आदिवासी, हरिजन–आता प्रथमच उच्च शिक्षणापर्यंत येऊन पोचत आहेत. निवडक प्रवेशाचे तत्त्व अंमलात आणल्यास आपल्या मुलांना उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात प्रवेश मिळण्याची संधी अशक्यप्राय होईल असे साहजिकपणेच या वर्गांना वाटते. उच्च शिक्षणाची दारे आपल्याला बंद झाली की आपला सामाजिक व आर्थिक अभ्युदय करून घेण्याचा एकमेव मार्ग आपल्याला बंद होईल अशी त्यांची रास्त भीती आहे. या वर्गाची ही भीती दूर करावयाची तर दोन गोष्टी केल्या पाहिजेत. एकतर, सध्याची ‘ मुक्तद्वार प्रवेश ’ पद्धती प्रथमदर्शनी दिसावयास मुक्त वाटली तरी प्रत्यक्षात त्या पद्धतीचा फायदा मुख्यत्वेकरून श्रीमंत व वरिष्ठ

---

१६. याची उत्तरे अनेकविध असू शकतील. आम्ही समाजाची शिक्षणाची भूक भागवतो हे एक सर्वसामान्य असे उत्तर झाले. सामाजिक प्रतिष्ठेचा मार्ग आम्ही सर्व वर्गांना खुला करतो, हे याचे दुसरे उत्तर होऊ शकेल. या विद्यार्थ्यांना एरवी मिळाली असती त्यापेक्षा अधिक चांगली नोकरी मिळवण्याची पात्रता येते हे आर्थिक लाभाच्या दृष्टीचे उत्तर असू शकते. यापैकी काहीही साध्य होणार नसले तरी चार वर्षे नुसता बेकार म्हणून तो समाजात वावरण्यापेक्षा तो कोठेतरी गुंतून राहतो हाही काही कमी उपयोग नाही असे मानणाराही एक वर्ग आहे.

ही उत्तरे खरोखरच समाधानकारक आहेत काय ? आजची बेकारी टाळण्यासाठी हा सर्व खर्च केला पाहिजे काय ? उद्याच्या अधिक असंतुष्ट बेकारांचा वर्ग निर्माण करणे एवढेच यातून साध्य होणार नाही काय ? आर्थिक लाभाच्या दृष्टीनेच विचार करावयाचा तर, ज्या ठिकाणी पदवीपरीक्षेच्या ज्ञानाची खरोखरच आवश्यकता नाही तेथे, एस्. एस्. सी. नंतर सरळ भरती करून नंतर त्याच्या विशिष्ट कामाचे त्याला विशेष शिक्षण देणे अधिक उपयुक्त व कमी खर्चाचे ठरणार नाही काय ? आर्थिक लाभाबरोबर सामान्यपणे काही सामाजिक प्रतिष्ठा येते. परंतु सामाजिक प्रतिष्ठेसाठी पदवी आवश्यक वाटलीच तर एक्स्टर्नल परीक्षा, संध्याकाळचे वर्ग, पत्रव्यवहाराने मार्गदर्शन (Correspondence Courses) या मार्गाने पदवी मिळविण्याचीही शक्यता ठेवता येईल. मग महाविद्यालयातच प्रवेश घेतला पाहिजे व वेळ, पैसा व साधनसामग्री यांचा अपव्यय केला पाहिजे याची आवश्यकता काय ?

वर्गांनाच कसा मिळतो हे त्या वर्गांना सांगितले पाहिजे. मुक्त संधी असली तरी त्या संधीपर्यंत पोचण्याचीच ज्याची परिस्थिती नाही—सामाजिक, आर्थिक—त्याला ती संधी असून नसल्यासारखीच आहे. ही आजच्या परिस्थितीतील कटू वस्तुस्थिती त्या वर्गाच्या नजरेला आणून देणे आवश्यक तर आहेच; परंतु त्याहूनही अधिक महत्त्वाची गोष्ट, त्यांना तशी संधी प्रत्यक्षात घेता येईल अशी विविध अनुकूलता निर्माण करणे ही आहे.

निवडक प्रवेशाचा अर्थ दुहेरी करण्याची गरज आहे. शैक्षणिक सोयी व साधन-संपत्तीच्या उपलब्धतेनुसार विशिष्ट अभ्यासक्रमात मर्यादित संख्येने विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल, असा एक अर्थ आहे. त्याचा दुसरा अर्थ समाजातील सर्व सामाजिक व आर्थिक थरांतील होतकरू व बुद्धिमान मुलांची निवड करून त्या मुलांना उत्तमातील उत्तम शिक्षण घेता यावे यासाठी सर्वप्रकारची अनुकूलता निर्माण करून देणे हा आहे. शिक्षणातील समान संधीचा खरा अर्थ हा आहे. समान गुणवत्तेच्या मुलांना समान शैक्षणिक संधी मिळण्याच्या आड त्यांची आर्थिक परिस्थिती, त्यांची जात, त्यांचा पेशा, वा अन्य गोष्टी येणार नाहीत याची खबरदारी समाजाने व शासनाने घेतली पाहिजे. या विधायक अर्थाने समान संधी प्रस्थापित करावयाची झाल्यास ‘ समाना संधीचे तंत्र ’ या प्रकरणातील सुचविलेल्या उपायांनी होतकरू, बुद्धिमान मुलांन आर्थिक, सामाजिक वा अन्य कारणांनी येणारे पंगुत्व दूर केले पाहिजे.

‘ निवडक प्रवेश ’ या शब्दप्रयोगाचे हे दोन अर्थ जर एकाच वेळी ध्यानी घेतले तर विद्यार्थ्यांची निवड करून प्रवेश देणे या मार्गाने, ‘ आहे रे ’च्या पथ्यावर पडणाऱ्या आजच्या ‘ मुक्तद्वार प्रवेशा ’पेक्षा, खरी समान संधी प्रस्थापित होणार आहे ही गोष्ट लक्षात येईल.

दहा

# महाराष्ट्राची वाटचाल

महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक समान संधी अस्तित्वात आणण्याच्या दृष्टीने काय करता येईल याचा विचार राज्यसरकारच्या प्रेरणेने घेण्यात आलेल्या काही शैक्षणिक चर्चा-सत्रांतून करण्यात आला. या चर्चासत्रासाठी केलेल्या मांडणीतून भावी दिशेचे सूचन मिळते ते असे : [१७]

(१) शिक्षणाची समान संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने सम्मीलित शाळांच्या (कॉमन-स्कूल) योजनेस अग्रहक्क दिला पाहिजे. सार्वजनिक व्यवस्थापनाखालील काही शाळांची निवड करून त्यात गुणवत्तेची पातळी उत्कृष्ट ठेवणे आणि त्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना विनाशुल्क शिक्षण देणे हा सम्मीलित शाळायोजनेचा कणा आहे. या शाळांचा दर्जा इतका उत्कृष्ट असावा की फीचा भार न सोसतादेखील आपल्या मुलांना उत्कृष्ट शिक्षण मिळू शकेल असा विश्वास पालकांना वाटावा. उत्कृष्ट शिक्षण विनामूल्य देण्याची जबाबदारी शासनाची आहे हे आता मान्य केले पाहिजे. ज्यांना फी भरण्याची आर्थिक शक्ती आहे त्यांच्याच पाल्यांसाठी उत्कृष्ट शिक्षण राखून ठेवण्याने सामाजिक विषमता वाढण्याचा जो संभव असतो तो दर्जेदार सम्मीलित शाळांच्या निर्मितीने हळूहळू कमी होऊ लागेल.

(२) शिक्षणाच्या सर्व स्तरांवर विद्यार्थी-कल्याण योजना फार मोठ्या प्रमाणात राबविण्यात आल्या पाहिजेत. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना विनामूल्य पाठ्य पुस्तके व लेखनसाहित्य पुरविणे; माध्यमिक आणि उच्च शिक्षणाच्या स्तरावर पुस्तकपेढ्या आणि पाठ्यपुस्तकांची संग्रहालये चालवणे; दिन-अभ्यासिका, वसतिगृहे, आरोग्यसेवा, वाहनांची सोय आणि शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शन यांचा लाभ; या महत्त्वाच्या गोष्टींचा अंतर्भाव विद्यार्थी-कल्याण योजनांमध्ये झाला पाहिजे.

(३) शिक्षणाच्या सर्व स्तरांवर आणि शाखा-उपशाखांमध्ये शिष्यवृत्त्यांचा कार्यक्रम पुष्कळ विस्तृत प्रमाणात अमलात आणणे अत्यावश्यक आहे. या कार्यक्रमाच्या द्वारे निदान बुद्धिमान मुलांना तरी उत्कृष्ट शिक्षण मिळावे म्हणून

१७. महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद्, २६-२७, नोव्हेंबर १९६६, चर्चा-विषय पृ. ४३-४४.

दर्जेदार संस्थांमध्ये त्यांना प्रवेश देण्याची व्यवस्था व्हावी. आर्थिक असहाय्यतेमुळे शिक्षणामध्ये अडचणी येण्याचा प्रसंग कोणाही बुद्धिमान विद्यार्थी–विद्यार्थिनीवर येणार नाही अशी दक्षता बाळगली पाहिजे. या दृष्टीने शिक्षण महामंडळाने सुचविलेल्या प्रमाणात ही सोय उपलब्ध करून देण्याच्या दिशेने वाटचाल झाली पाहिजे.[१८]

(४) मुली आणि मागासलेले वर्ग यांच्या शिक्षणाला विशेष उत्तेजन दिले पाहिजे. या उत्तेजनाचे स्वरूप सामाजिक तसेच आर्थिक असावे लागेल.

(५) वेगवेगळ्या जिल्ह्यांतील शैक्षणिक विकासामध्ये जी विषमता आढळते तिचे निराकरण केले पाहिजे. या दृष्टीने विषमतेच्या कारणांचा अभ्यास करून मागास भागांना अधिक साह्य देणे आवश्यक मानावे.

हा सर्व कार्यक्रम स्वागतार्हच आहे यात शंका नाही. परंतु तो नीट कार्यवाहीत आणण्याच्या दृष्टीने काही दक्षता घ्यावी लागेल. ती अशी :

(१) ह्या प्रतिवार्षिक कार्यक्रमासाठी दरवर्षी आवश्यक तो पैसा उपलब्ध राहील याची दक्षता शासनाने घेतली पाहिजे. ही गोष्ट केवळ शिक्षणखात्याने दक्षता घेऊन साध्य होणार नाही. शासनाला आपल्या एकूण राज्यविषयक धोरणात शिक्षणविषयक प्रयत्नाला वरचा अग्रक्रम देण्याचे धोरण निश्चितपणे स्वीकारावे लागेल. एरव्ही, ज्या ज्या वेळी आर्थिक टंचाईचा प्रश्न निर्माण होतो त्या त्या वेळी शिक्षणक्षेत्रावर कपातीचा पहिला आघात होण्याची भीती राहते.

(२) धोरण ठरले तरी अनेक गोष्टींचा तपशील विचारपूर्वक ठरविला जाणे आवश्यक असते. त्याच्या अभावी निर्माण होणाऱ्या गोंधळाचा अनुभव भारतात सर्वत्र, शिक्षणाच्या विविध स्तरांवर अनेक वेळा येतो. परंतु हा तपशील ठरवण्याचा

१८. प्रत्येक शैक्षणिक स्तरावर शिष्यवृत्त्यांसाठी निवडावयाच्या विद्यार्थ्यांचे शिक्षण महामंडळाने सुचविलेले प्रतिशत प्रमाण.

| | १९७५-७६ | १९८५-८६ |
|---|---|---|
| उच्च प्राथमिक | २.५ | ५ |
| माध्यमिक ( सामान्य पाठ्यक्रम ) | ५ | १० |
| माध्यमिक ( व्यावसायिक ) | ३० | ५० |
| पदवीपूर्व शिक्षण ( ज्ञान, विज्ञान व वाणिज्य ) | १५ | ३५ |
| पदवीपूर्व शिक्षण ( व्यावसायिक ) | ३० | ५० |
| पदव्युत्तर शिक्षण | २५ | ५० |



९५८६२

प्रयत्न एक कालहरणाचा मार्ग होऊ नये यासाठी ते काम विचारपूर्वक परंतु तातडीनेच होणे आवश्यक आहे.

(३) काही सूचनांचा परस्परमेळ घालून जाणीवपूर्वक काही विशेष निर्मिती करता येण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ कॉमन-स्कूलला जोडून वसतिगृहातील निवास, शिष्यवृत्त्यांचा कार्यक्रम यांसारख्या गोष्टींचा नीट उपयोग केल्यास समान संधीच्या दृष्टीने परिणामकारक कार्य होऊ शकेल.

(४) मागासलेल्या वर्गांना द्यावयाच्या सामाजिक उत्तेजनाचा तपशील काळजीपूर्वक ठरवावा लागेल. शिक्षणाच्या क्षेत्रात भारतीय किंवा राज्यपातळीवर चर्चा होताना अजूनही या उत्तेजनाचा प्रत्यक्ष आशय पुरेसा स्पष्ट झालेला नाही.

(५) गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्रात झालेला शिक्षणाचा प्रसार हा शैक्षणिक समान संधीच्या दृष्टीने राज्यसरकारने १२०० रु. च्या खालील उत्पन्नाच्या कुटुंबातून येणाऱ्या मुलांना दिलेल्या फी मदतीतून, त्याचप्रमाणे शैक्षणिक प्रसाराच्या निकडीतून झालेला आहे. हे घडलेले कार्य समान संधीच्या दृष्टीने उपयुक्तच आहे. परंतु याचे सुजाणपणे नियोजन होऊ शकल्यास सध्याच्याच साधनसंपत्तीत याहूनही अधिक व याहून चांगले कार्य करता येईल. परंतु त्यासाठी आपल्या साचेबंद कल्पना मोकळ्या मनाने पुन्हा तपासून घेण्याची सर्वांनाच तयारी ठेवावी लागेल.

याखेरीजही आजच्या महाराष्ट्रात ज्या दिशेने कार्य होणे आवश्यक व शक्य आहे अशा काही गोष्टींचा निर्देश करून हे सर्व विवेचन संपवता येईल.

(१) कर्जाऊ शिष्यवृत्त्यांचा वापर, विशेषत: उच्च शिक्षणाच्या स्तरावर, मोठ्या प्रमाणात करता येईल. विद्यार्थ्यांना या कर्जाच्या परतफेडीचा अकारण ताण वाटू नये अशी त्याची रचनाही करता येईल. इतर राष्ट्रांतून तशी काही व्यवस्था करण्यात आलेलीही आहे. यासाठी लागणारा निधी सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका, इतर बँका, उद्योगधंदे, राज्यसरकार, केंद्र सरकार यांच्याकडून उभा करता येईल. दहा वर्षांच्या काळात दहा कोटींची अशी कर्जाऊ निधी असणारी संस्था (Educational Loan Finance Corporation) उभी राहू शकेल.

(२) वर्गीकृत जातीजमातींचे जे विद्यार्थी विविध शिक्षणसंस्थांतून शिक्षण घेत आहेत त्यांच्या विकासाची विशेष व्यवस्था करण्याची जबाबदारी त्या संस्थांवर, आवश्यक त्या अनुदानासह (परंतु त्या संस्थांकडूनही काही ध्येयवादी त्यागी कार्याची अपेक्षा ठेवून,) टाकता येईल.

(३) मागस वर्गातील बुद्धिमान विद्यार्थ्यांना विशेष चांगल्या शिक्षणसंस्थांकडे पाठवून त्यांच्या गुणवत्तेचा पुरेपूर विकास करण्याची जबाबदारी अशाच पद्धतीने त्या संस्थांवर टाकता येईल.

(४) वर्गीकृत जमातींमध्ये जाऊन काम करणाऱ्या संस्थांची, व्यक्तींची आज निकडीची गरज आहे. अशा संस्था वा व्यक्ती हव्या आहेत म्हणून निर्माण होऊ शकतात असे नाही ही गोष्ट खरी आहे. परंतु त्यासाठी जेवढी अनुकूलता निर्माण करणे शक्य आहे तेवढी करण्याचा प्रयत्न सरकार करू शकेल. आज अनेक वर्षे अस्तित्वात असलेल्या व अनेक विद्यालये–महाविद्यालये चालविणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यांनी असा प्रयत्न करावा असे आवाहन केले जावे व त्या कार्यातील योग्य त्या अडचणींचा निरास करण्याचा त्या संस्थांतील कार्यकर्त्यांच्या बरोबर सरकारही प्रयत्न करील असे आश्वासनही दिले जावे. याला जर योग्य प्रतिसाद मिळाला नाही तर समान संधीची आपल्या समाजमनातील जाणीव ही क्रांतिकारी नसून केवळ आपापल्या वर्गापर्यंत समान संधी आणून पोचविण्याइतपतच कार्यकारी व खऱ्या क्रांतिकारकतेच्या दृष्टीने बोथट आहे असे समजावे लागेल.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २८२०० वि: मिक्षांध
क्रमांक १८५१ नोंद दिन २५।३।६८

अकरा

# समारोप

आर्थिक विषमतेमुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक संधीच्या विषमतेचे निराकरण करणे तुलनात्मक दृष्टचा थोडेसे अधिक सोपे असते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या मार्गात उभ्या असणाऱ्या विविध आर्थिक अडचणी दूर केल्या की सामान्यपणे या विषमतेमुळे निर्माण होणारे पुष्कळसे दुष्परिणाम टाळता येतात. या ठिकाणी मग केवळ या अडचणी दूर करण्यासाठी लागणारा पुरेसा पैसा राज्यसत्तेकडे उपलब्ध आहे की नाही व असलेल्या पैशाचा उपयोग योग्य धोरणाने व अपव्यय होऊ न देता होत आहे की नाही एवढेच प्रश्न उरतात.

सामाजिक विषमतेमुळे निर्माण होणारी शैक्षणिक संधीची विषमता दूर करणे हे अधिक दुर्घट काम आहे. सर्वच राष्ट्रांतून आलेला व येत असलेला हा अनुभव आहे. जातिसंस्थेसारख्या सामाजिक संस्थांमुळे ज्या वेळी सामाजिक अभिसरणाचे प्रवाह अनेक शतके कुंठित झालेले असतात त्या ठिकाणी तर ह्या विषमतेचे परिणाम एखाद्या जुनाट दुर्धर रोगाप्रमाणे समाजाच्या हाडीमासी मुरलेले असतात. सामाजिक अभिसरण वाढवून ही विषमता कमी करण्याचे नैसर्गिक मार्ग मोकळे करून देणे हाच यावरील मुख्य उपाय आहे.

सामाजिक अभिसरणामुळे शैक्षणिक क्षेत्रातील कार्याला गती मिळाली पाहिजे व शिक्षण क्षेत्रातील कार्य सामाजिक अभिसरणाची गती वाढविण्याच्या दृष्टीने पूरक झाले पाहिजे. आज या दृष्टीने काही हालचाल सुरू झालेली आहे. परंतु अनेक शतकांच्या इतिहासाच्या छाया अशा सहजासहजी दूर होत नाहीत. तशी अपेक्षा करणे भोळसट आशावादीपणाचे ठरेल. पूर्वजन्मीची नसली तरी पूर्वइतिहासाच्या सुकृत-दुष्कृतांची फळे समाज-पुरुषालाही चाखावीच लागतात.

समाजाच्या पुनर्रचनेत अनेक प्रश्नांचा गुंता हा या पूर्वसुकृत-दुष्कृताशी येऊन अडकलेला असतो. हा गुंता आपण अधिक वाढवावयाचा की कमी करावयाचा एवढाच आपल्यापुरता निर्णय सुजाण व्यक्तींना किंवा संघटनांना घ्यावयाचा असतो. एरवी सारे कर्मगतीप्रमाणे फिरतच असतात. शिक्षण क्षेत्रात ‘ संख्या की गुणवत्ता ’ या प्रश्नाच्या चर्चेत आढळून येणारा गुंता हे अशा प्रकारच्या गुंत्याचे एक सुस्पष्ट

उदाहरण आहे. इंग्लंडसारख्या राष्ट्रातदेखील या प्रश्नाची निकराची चर्चा अगदी कालपर्यंत चालू होती हे लक्षात घेतले म्हणजे भारतात आपण या चर्चेत आज व्यग्र आहोत याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

या चर्चेत सामाजिक संघटनांचे रागलोभ प्रत्यक्ष अप्रत्यक्ष वर उसळून येतात याचेही नवल वाटावयास नको. ते तसे उसळून वर न येतील तरच नवल. वरिष्ठ वर्गाने कनिष्ठ वर्गातील लोकांच्या मनात असलेल्या चिडीच्या भावनेला केवळ आत्मसंरक्षक चिडीच्या भावनेने उत्तर देणे हे शेवटी आत्मसंरक्षणाचेही ठरणार नाही, तर आत्मघाताचे ठरेल. कनिष्ठ वर्गांच्या मनात अशी चीड असावी याचे केवळ दुःख करूनही भागणार नाही. ती चीड असली तरी सामाजिक अन्यायाच्या विरुद्ध निर्माण झालेली चीड आहे हे वरिष्ठ वर्गाने समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

खरे आवाहन व आव्हान यापुढचे आहे. आपल्यावर झालेला अन्याय निमूटपणे सहन करतो तो वर्ग, किंवा ती व्यक्ती क्षुद्र कीटक होय. या हतबल सहनशीलतेपेक्षा अन्यायाविरुद्ध उभे राहताना निर्माण होणारा त्वेष हा अनंत पटींनी श्रेष्ठ होय. परंतु यात शौर्य असले तरी ते केवळ स्वार्थाधिष्ठित आहे. यामुळे समाजातील आजचा एक अन्याय दूर होईल व इतर कनिष्ठ वर्गांनाही आपल्यावर झालेल्या अन्याया-विरुद्ध झगडण्याची स्फूर्ति मिळेल हा यापासून होणारा सामाजिक लाभ असे म्हणता येईल. परंतु समाजाचे झपाट्याने परिवर्तन व्हावे अशी इच्छा असेल तर केवळ एवढ्याने भागणार नाही. आम्ही आमच्यावर झालेला अन्याय तर सहन करणार नाहीच, परंतु सामर्थ्याच्या बळावर दुसऱ्यावर अन्याय करणार नाही; इतकेच नव्हे तर, ज्या ज्या ठिकाणी अन्याय घडत असेल तेथे तेथे त्याच्या विरुद्ध उभे राहू अशा क्रान्तिकारक वृत्तीच्या कार्यकर्त्यांच्या वर्गाची आज गरज आहे. हा कार्यकर्त्यांचा वर्ग समाजातील सर्व थरांतील सुजाण व्यक्तींचा मिळून असाच तयार होईल.

या वर्गाने शिक्षण क्षेत्रात आपल्यासमोर ठेवावयाचे अंतिम चित्र स्पष्ट आहे. इतर समाजांच्या, राज्यांच्या, राष्ट्रांच्या तुलनेत आपण युद्धकालात किंवा विकासकार्याच्या गतीत उणे ठरणार नाही इतकी गुणवत्तेची जोपासना आपण केलीच पाहिजे. परंतु गुणवत्ता ही काही कोणा वर्गाची मिरासदारी नाही. अशा मिरासदारीला शरीरशास्त्राचा, मानसशास्त्राचा, मानववंशशास्त्राचा काहीही आधार नाही. आज चालत आलेली मिरासदारी ही विशिष्ट सामाजिक इतिहासा-

तून निर्माण झालेली मिरासदारी आहे. सर्वच देशांतून अशी मिरासदारी जवळजवळ पन्नास वर्षांपूर्वीपर्यंतच्या काळात अस्तित्वात होती. श्रीमंत वर्ग, उमराव वर्ग, श्वेतवर्णीय अशा वर्गांतील लोकच अधिक शिक्षण घेत व समाजात अधिक महत्त्वाच्या जागा पटकावीत. आज ही मिरासदारी रशिया, इंग्लंड, अमेरिका यासारख्या राष्ट्रांतून पुष्कळशी दूर झालेली आहे. परंतु तरीही तेथे अद्यापिही संपूर्ण समान संधीचे वातावरण अस्तित्वात आलेले आहे असे म्हणता येणार नाही. या राष्ट्रांच्या गेल्या पन्नास वर्षांच्या इतिहासावरून आपल्याला दोन महत्त्वाचे निष्कर्ष काढता येतील. एक निष्कर्ष असा की मूळची विषमता कितीही शतकांची असली तरी चार–पाच दशकांच्या काळात तिचा प्रभावी निरास करता येतो. दुसरा महत्त्वाचा निष्कर्ष हा की राष्ट्राची आर्थिक प्रगती झपाट्याने चालू राहिली तरच कोणालाही मागे न ओढता आजवर मागे राहिलेल्यांना पुढे असलेल्यांच्या बरोबर आणण्याचा यशस्वी प्रयत्न करता येतो.

येथे शिक्षणक्षेत्राचा विकसनशील अर्थव्यवस्थेच्या प्रयत्नाशी मूलगामी संबंध येतो. ही आर्थिक विकासाची गती भारताला साधता आली नाही तर सर्वच चर्चा व्यर्थ आहे. परंतु ती साधता आली व समान संधीच्या दिशेने जागरूक काळजी घेतली गेली, तर पन्नास वर्षांनंतरच्या भारतात समाजाच्या सर्व थरांत शैक्षणिक गुणवत्तेचे प्रमाण सारखेच आढळून येईल यात शंका नाही.

त्याच दिशेने आपल्याला वाटचाल करावयाची आहे.

९८८२
REFBK-0015942

ग. वि. अकोलकर

# माध्यमिक शिक्षण

हायस्कूलमध्ये अध्यापक, मुख्याध्यापक आणि आता कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य अशा विविध रीतींनी प्राचार्य ग. वि. अकोलकर यांनी शिक्षणक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावलेली आहे. अध्यापन करीत असतानाच त्यांनी शिक्षणविषयक विपुल लेखन केले. प्रत्यक्ष नैक्षणिक प्रयोगातून स्फूर्ती घ्यावयाची आणि लेखन करीत असताना सुचलेल्या कल्पनांतून नवनवे प्रयोग करावयाचे, या पद्धतीने सतत काम केल्यामुळे प्रा. अकोलकरांच्या मनाचा ताजेपणा कधीच कमी झालेला नाही.

'माध्यमिक शिक्षण' या विषयावरील सर्वांगपरिपूर्ण असे हे मराठीतील बहुधा एकमेवाद्वितीय पुस्तक ठरावे. या पुस्तकातील आकडेवारी १९६४ सालापर्यंत अद्ययावत् केलेली आहे. आपल्या प्रदीर्घ व्यावसायिक अनुभवांच्या चिंतनाचे प्रा. ग.वि. अकोलकरांनी या पुस्तकात काढलेले सार शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, समाजधुरीण आणि सुजाण नागरिक ह्या सर्वांनाच उद्‌बोधक ठरणारे आहे.

पृष्ठे २३४, क्राऊन ] [ किंमत रु. ४–००

समाज प्रबोधन संस्था
४३०–३१ शनिवार पेठ, पुणे २.

ॲडम कर्ल

# मागास देशांच्या विकासात शिक्षणाचे स्थान

भाषांतर : ग. वि. अकोलकर

पारंपरिक समाजांचा विकास घडवून आणण्यात शिक्षण महत्त्वाचे कार्य बजावीत असते. शिक्षण म्हणजे नवीन ज्ञानाचे ग्रहण आणि नवीन मूल्ये, पद्धती इत्यादींचा संस्कार असा व्यापक अर्थ कर्ल यांनी घेतला आहे. मागस, पारंपरिक समाजाची ठळक वैशिष्ठचे सांगून त्या समाजात नव-चैतन्य जागृत करण्याचे शिक्षण हे सर्वांत प्रभावी साधन कसे आहे ते त्यांनी दाखवून दिले आहे. ते असे म्हणतात, ‘कोणताही भेदभाव न करता शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार केल्यास समता प्रस्थापित करणारी ती जगातली सर्वांत प्रभावी शक्ती आहे. दरिद्री, मागासलेल्या व आजवर उपेक्षित राहिलेल्या बहुजनसमाजाला मिळणारे शिक्षण ही विधायक स्वरूपाचे परिवर्तन घडवून आणणारी चैतन्यशक्ती आहे. शाळा हे समाजाच्या आशेचे प्रतिक आहे.’ या दृष्टिकोनातून विकसनशील राष्ट्रांतून शिक्षणाचा विस्तार घडून येत असताना कोणती विशेष पथ्ये सांभाळली पाहिजेत त्यांची चर्चा कर्ल यांनी आपल्या या छोटचा पुस्तिकेत केली आहे.

पृष्ठे ५७, डेमी ] [ किंमत रु. १–२०


समाज प्रबोधन संस्था

४३०–३१ शनिवार पेठ, पुणे २.